लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
दीपावलीच्या तमाम जनतेस हार्दिक शुभेच्छा !

सोलापूर विमानतळापासून फक्त ५ कि.मी. अंतरावरील १० एकर बागायत शेतजमीन विकणे आहे. १ एकर पॉलिहाऊस, १.५ एकर शेडनेट नर्सरीसाठी उपयुक्त.
संपर्क:- 9850530355 9158821555
(594)

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक ९३ वा | शनिवार, दि. ०२ नोव्हेंबर २०२४ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# जिल्ह्यात यंदा वाढले 4.57 लाख मतदार



## उमेदवारांना प्रचारासाठी १५ दिवसच!

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा निवडणुकीच्या सोलापूर जिल्ह्यातील ११ मतदारसंघाच्या मैदानात सद्य:स्थितीत तब्बल ३३३ उमेदवार आहेत. उमेदवारी अर्ज मागे घ्यायला सोमवारचाच (ता. ४) दिवस आहे. त्यामुळे शेवटच्या दिवशी यातील कितीजण उमेदवारी मागे घेणार, याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

पण, प्रत्येक उमेदवाराला त्या मतदारसंघातील एकूण वैध मतांच्या एक षष्ठांश (उदा. एकूण मतदानातील एक लाख ८० हजार मते वैध असल्यास त्यापैकी ३० हजार मते पडायलाच हवीत) मते घ्यावीच लागतील, अन्यथा त्यांना डिपॉझिट परत मिळणार नाही. जिल्ह्याच्या अंतिम मतदार यादीमध्ये तृतीयपंथी मतदार ३१० आहेत. त्यात माढा मतदारसंघात अवघे तीन तर सांगोल्यात पाच तृतीयपंथी आहेत. २०१९च्या निवडणुकीत ६५ टक्क्यांपर्यंत मतदान झाले होते, यंदा त्यात वाढ होईल, असा विश्वास जिल्हा प्रशासनाला आहे. या निवडणुकीत अपक्षांची संख्या जास्त राहिल्यास ज्या उमेदवाराला ७० हजारांपर्यंत मते मिळतील तो विजयी होऊ शकतो. पण, मतदान किती टक्के होते आणि निवडणुकीच्या रिंगणात किती उमेदवार असणार, यावर ते समीकरण अवलंबून असणार आहे. २०१९च्या निवडणुकीसाठी एकूण ३३ लाख ९१ लाख ८१४ इतके मतदार होते. २०२४ च्या निवडणुकीत ३८ लाख ४८ हजार ८६९ मतदार आहेत. मागील निवडणुकीच्या तुलनेत चार लाख ५७ हजार ५५ मतदार वाढले आहेत. वाढलेले मतदान कोणाच्या पथ्यावर पडणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### उमेदवारांकडून मतदार यादीचा अभ्यास

लोकसभा निवडणुकीत अनेक मतदारांकडे मतदान कार्ड असताना देखील मतदार यादीत नावे नसल्याने त्यांना मतदानाचा हक्क बजावता आला नव्हता. या पार्श्वभूमीवर आता प्रत्येक उमेदवारांनी स्वतःहून विभागनिहाय मतदार यादी तयार करून आपल्या विश्वासातील कार्यकर्त्यांकडे दिली आहे. आपल्याला खात्रीने पडणाऱ्यांची नावे त्यात आहेत की नाही, याची शहानिशा केली जात आहे. याशिवाय आपल्याला मागच्या निवडणुकीत कोणत्या ठिकाणी कमी मतदान झाले होते असे भाग काढून त्याठिकाणी पोचण्याचे नियोजनही उमेदवारांनी केले आहे.

### उमेदवारांना प्रचारासाठी १५ दिवसांचा अवधी

निवडणुकीचा उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत ४ नोव्हेंबरला संपणार आहे. त्यानंतर अंतिम उमेदवारांच्या गावागावात प्रचाराच्या तोफा धडाडणार आहेत. उमेदवारांनी पाच वर्षांत केलेल्या कामांवर व एकूण आणलेल्या निधीवर गाणी तयार केली आहेत. त्याचाही आवाज घुमणार आहे. रात्री दहानंतर प्रचाराच्या तोफा थंडावतील. जिल्ह्यातील बहुतेक उमेदवारांनी प्रचारासाठी आणि निवडणुकीत मतदानाच्या दिवशी मतदारांना केंद्रांपर्यंत आणण्यासाठी वाहनांची आतापासूनच व्यवस्था करायला सुरवात केली आहे. त्यामुळे खासगी प्रवाशांच्या शोधात दिवसभर वणवण फिरणाऱ्या वाहनचालकांना यातून मोठा रोजगार मिळणार आहे. याशिवाय उमेदवारांचे पॅम्प्लेट, चिन्हांचा घरोघरी प्रचार करण्यासाठी देखील कार्यकर्त्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. अनेकांनी अशा कार्यकर्त्यांसाठी दररोज रोजगार देण्याचीही व्यवस्था केल्याचे बोलले जात आहे. या काळात गावागावातील हॉटेल व्यवसायिकांचा व्यवसाय देखील वाढणार आहे.

### गावागावातील कार्यकर्ते ॲक्टिव्ह

पाच वर्षे आमदार किंवा त्यांच्या भागातील नेत्यांकडे विविध कामे घेवून जाणाऱ्या कार्यकर्त्यांना आता निवडणुकीत आपला उमेदवार विजयी होण्यासाठी त्यांना झटून काम करावे लागणार आहे. गावागावात आता त्यांच्या माध्यमातून मतदारांना आवाहन केले जात आहे. दुसरीकडे प्रचारासाठी किंवा उमेदवाराकडे जाणाऱ्या प्रत्येकाच्या चहापानाची स्पेशल व्यवस्था देखील करण्याचे नियोजन सुरू झाले आहे.

**जिल्ह्यातील मतदारसंघनिहाय मतदार**

| मतदारसंघ | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|
| करमाळा | १,७१,५१५ | १,५७,४६८ | ३,२८,९९४ |
| माढा | १,८३,९४८ | १,६८,७४० | ३,५२,६९१ |
| बार्शी | १,७३,४५३ | १,६४,००२ | ३,३७,४९९ |
| मोहोळ | १,७३,१२१ | १,५८,३२९ | ३,३१,४५८ |
| शहर उत्तर | १,६२,४६७ | १,६६,०५९ | ३,२८,५७२ |
| शहर मध्य | १,७०,५०९ | १,७६,११५ | ३,४६,६७७ |
| अक्कलकोट | १,९६,५७७ | १,८६,९६४ | ३,८३,४७९ |
| दक्षिण सोलापूर | १,९५,७५१ | १,८६,९६४ | ३,८२,७५४ |
| पंढरपूर-मंगळवेढा | १,९१,४६४ | १,८२,१९४ | ३,७३,६८४ |
| सांगोला | १,७२,७०४ | १,६०,७८४ | ३,३३,४९३ |
| माळशिरस | १,८०,३२२ | १,६९,२१४ | ३,४९,५६८ |
| **एकूण** | १९,७१,८३१ | १८,७६,७२८ | ३८,४८,८६९ |

## उजनी धरणाचे दरवाजे आता ३ महिने राहणार बंद!

### धरणात सध्या १११ टक्के पाणी


**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जुलैपर्यंत उणे पातळीतील उजनी धरण ४ ऑगस्टपूर्वी भरले आणि धरणातून पाणी भीमा नदी, कॅनॉल, उपसा सिंचन योजनांमधून सोडून द्यावे लागले. मागील दोन महिन्यांत धरणातून तब्बल १०६ टीएमसी पाणी सोडून द्यावे लागले आहे.

अजूनही उजनीत दौंडवरून २८०० क्युसेकचा विसर्ग सुरू असून, धरण सध्या १११ टक्के भरले आहे. त्यामुळे आगामी आठ दिवसांत विसर्ग बंद झाल्यावर उजनीचे सगळेच दरवाजे पुढे तीन महिन्यांसाठी बंद केले जाणार आहेत.

सोलापूर शहर, धाराशिव, कर्जत- जामखेड, इंदापूरसह सोलापूर जिल्ह्यातील १३० हून अधिक ग्रामपंचायती, एमआयडीसी व साखर कारखान्यांना आणि दीड लाख हेक्टरला उजनीच्याच पाण्याचा आधार आहे. शेतीशिवाय एकूण ४३ योजना उजनी धरणावर अवलंबून आहेत. गतवर्षीच्या दुष्काळानंतर यंदा उजनी धरण ओव्हरफ्लो झाले असून सध्या धरणात १२ महिने पुरेल इतका पाणीसाठा आहे.

या पार्श्वभूमीवर जानेवारीअखेर शेतीला पहिले आवर्तन तर मार्चअखेर किंवा एप्रिलच्या सुरवातीला दुसरे आवर्तन आणि मेअखेर गरजेनुसार आणखी एक आवर्तन सोडले जाऊ शकते. धरणातील पाण्याचे नियोजन कालवा सल्लागार समितीत निश्चित होणार असून, समितीची बैठक आता नवीन सरकार सत्तेवर आल्यावर डिसेंबरअखेर होणार आहे.

**उजनी धरणाची सद्य:स्थिती**
**एकूण पाणीसाठा**
१२३.२८ टीएमसी
**उपयुक्त पाणीसाठा**
५९.६२ टीएमसी



**धरणातील पाण्याची टक्केवारी**
१११.२८ टक्के
**दौंडवरून येणारा विसर्ग**
२८०० क्युसेक

### देगाव योजनेतून पहिल्यांदा सुटणार पाणी

दक्षिण सोलापूर व अक्कलकोटमधील अनेक गावांना फायदा होईल अशा देगाव उपसा सिंचन योजनेचा पहिला टप्पा काही दिवसांत पूर्ण होईल. सध्या देगावजवळील रेल्वे ब्रीजवरील काम सुरू असून १५ दिवसांत ते पूर्ण होईल, अशी सद्य:स्थिती आहे. जानेवारी- फेब्रुवारीत सुटणाऱ्या पहिल्या आवर्तनाचे पाणी देगाव उपसा सिंचन योजनेतून पहिल्यांदाच सुटणार आहे. सुरवातीला दक्षिण सोलापुरातील सहा हजार हेक्टरला त्यातून पाणी मिळणार आहे.

### समांतर जलवाहिनीमुळे १५ टीएमसी पाण्याची बचत

सोलापूर शहराचा पाणीपुरवठा सुरळीत व्हावा म्हणून समांतर जलवाहिनी टाकली जात असून, त्याचे काम नोव्हेंबरअखेर पूर्ण होईल. त्यानंतर भीमा नदीतून सोलापूर शहराच्या पिण्यासाठी पाणी सोडायचे बंद होईल. त्यामुळे अंदाजे १२ ते १५ टीएमसी पाण्याची बचत होणार आहे. ते पाणी शेतीसाठी किंवा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला (एमआयडीसी) देता येईल.

## पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा निवडणुक तिरंगी होणार की चौरंगी जनतेत संभ्रम



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा निवडणुकीत पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात अनेक उमेदवार गुडघ्याला बाशिंग बांधून तयार होते परंतु महायुती व महाविकास आघाडीचे वरीष्ठ पातळीवर अनेक खलबत्ते झाले असल्याचे पहावयास मिळाले. अनेक नाट्य मय घडामोडी नंतर महायुतीने भारतीय जनता पार्टीचे विद्यमान आमदार समाधान आवताडे यांना उमेदवारी घोषित केले तर महाविकास आघाडीमध्ये अनपेक्षित असा बदल घडविला आणि विठ्ठल व सह. साखर कारखान्याचे माजी चेअरमन भगिरथ भालके यांना कॉंग्रेसकडून उमेदवारी जाहीर केली.तर राष्ट्रवादी (शरद पवार गट) यांनी देखील भैरवनाथ शुगरचे अनिल सावंत यांना उमेदवारी देण्यात आली.

या विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांची उमेदवारी सर्व प्रथम जाहीर झाली असल्याने ते पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात जोरदार प्रचार करीत असल्याचे पाहायला मिळत आहे.पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील जानकार राजकीय लोकांकडून महाविकास आघाडीने दोन उमेदवार दिल्याने नाराज असल्याचे दिसून येत आहे.

विद्यमान आमदार समाधान आवताडे यांनी विकास कामांच्या जोरावर आपण निश्चिंत विजयी होणार असल्याचे सांगतात तर पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघांतील सर्व सामान्य जनतेचा सर्वांगीण विकासाच्या नावाखाली फसवणूक करणाऱ्या उमेदवारांचा पराभव अटळ असुन आपलाच विजय निश्चित असल्याचे भगिरथ भालके असे म्हणतात आणि मतदार संघाचे विकासाचे व्हिजन घेऊन मी जनतेसमोर जात आहे आणि मला देशाचे नेते शरद पवार यांचा आशीर्वाद असल्याने माझा विजय निश्चित असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांनी बोलताना म्हणाले की पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघांतील सर्व सामान्य जनतेला गटा तटाचे राजकारणाचा विट आलाय त्यामुळे मला मतदार संघातील जनतेचा आर्शिवाद मलाच मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## शिंदे गट-अजित पवार गटाचा भाजपाने केला करेक्ट कार्यक्रम ?

**मुबई (वृत्त सेवा) :-** विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. महायुती आणि महाविकास आघाडीतील नेत्यांकडून त्या त्या पक्षातील बंडखोरांची समजूत काढण्याचे प्रयत्न सुरू आहे.

ही मनधरणी यशस्वी होणार का? याचे उत्तर अर्ज मागे घेण्याच्या अंतिम मुदतीनंतर मिळणार आहे. निवडणुकीसाठी अनेक जण इच्छूक होते. अनेकांनी उमेदवारीसाठी आपले सर्व वजन पणाला लावले. अनेकांना त्या त्या पक्षांकडून उमेदवारीही जाहीर झाली. परंतु, काही जणांना संधी मिळाली नाही. महायुतीचा विचार केल्यास भाजपामधील १७ इच्छुकांनी मित्र पक्षात जाऊन उमेदवारी पक्की केल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे शिंदे गट-अजित पवार गटाचा भाजपाने केला करेक्ट कार्यक्रम? अशी चर्चा राजकीय वतुर्ळात जोरात सुरू आहे.

भाजपाच्या १२ इच्छुकांनी एकनाथ शिंदेंच्या पक्षात प्रवेश केला आणि उमेदवारी मिळवली.



तर चार जणांनी अजित पवारांच्या पक्षात जाऊन उमेदवारी पदरात पाडून घेतली. आरपीआयच्या कोट्यातून एक जागा मिळाली आहे. तो उमेदवार भाजपाच्या कमळ या चिन्हावर निवडणूक लढवत असल्याचे सांगितले जात आहे. भाजपाची उमेदवारांची यादी जाहीर झाल्यानंतर आपल्याला संधी मिळाली नाही किंवा ती जागा मित्र पक्षाला सुटली, हे पाहून इच्छुकांनी पक्षांतर करत निवडणूक रिंगणात जागा पक्की केली. मूळ भाजपामध्ये असलेले परंतु, शिवसेना शिंदे गटात आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटात जाऊन उमेदवारी मिळवलेल्या इच्छुकांची संख्या १७ वर जात असल्याचे सांगितले जात आहे. यामुळे भाजपाने निवडणुकीच्या जागावाटपात १५२+ १७ अशी १६९ जागांची बाजी मारल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात सुरू झाल्याचे म्हटले जात आहे.

### भाजपामधून शिवसेना शिंदे गटात जात उमेदवारी मिळालेले नेते कोण?

- निलेश राणे - कुडाळ
- संजय जाधव दानवे - कणंद
- राजेंद्र गावित - पालघर
- विलास तरे - बोईसर
- संतोष शेट्टी - भिवंडी
- मुरजी पटेल - अंधेरी पूर्व
- शायना एनसी - मुंबादेवी
- अमोल खताळ - संगमनेर
- अजित पिंगळे - धाराशिव
- दिग्विजय बागल - करमाळा
- विठ्ठल लांघे - नेवासा
- बळीराम शिर्सेकर - बदलापूर

### भाजपामधून राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटात गेलेले नेते कोण?

- राजकुमार बडोले - अर्जुनी मोरगाव
- प्रतापराव चिखलीकर - लोहा
- संजयकाका पाटील - तासगाव
- निशिकांत पाटील - इस्लामपूर

## सोलापूर : निवडणुकीच्या रणांगणातून दोघा उमेदवारांची माघार




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा निवडणुकीच्या रणांगणातून गुरूवारी (दि.३१) सांगोला विधानसभा मतदारसंघातून एक आणि अक्कलकोट मतदारसंघातून एक अशा एकूण दोघा उमेदवारांनी माघार घेतली असून आता ३३३ उमेदवार राहिले आहेत.

मंगळवारी (दि.२९) अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस होता. यादरम्यान जिल्हयातील अकरा विधानसभा मतदारसंघात अखेरच्या दिवसापर्यंत ३८४ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. बुधवारी (दि. ३०) छाननीत ४९ उमेदवारांचे अर्ज विविध कारणावरून बाद ठरले. त्यानंतर निवडणुकीच्या आखाड्यात ३३५ उमेदवार राहिले होते. अर्ज मागे घेण्यासाठी ४ नोव्हेंबर दुपारी ३ पर्यंत मुदत आहे. दरम्यान, गुरूवारी सांगोला विधानसभा मतदारसंघातून धनाजी दत्तात्रय पारेकर व अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातून दत्तात्रय खंडू माडकर या अपक्ष उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले. अर्ज माघारीनंतर सांगोल्यात ३१ तर अक्कलकोटमध्ये १४ उमेदवार शिल्लक राहिले आहेत. आता जिल्हयातील अकरा विधानसभा मतदारसंघातील रणांगणात ३३३ उमेदवार राहिले असले तरी सोमवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख असल्याने सोमवारी किती उमेदवारी माघार घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दुसरीकडे बंडाचे निशाण फडकविलेल्या उमेदवारांनाही शांत करण्याचे प्रयत्न त्या त्या राजकीय पक्षांकडून होत आहेत. दरम्यान, सोमवारी अर्ज माघारीनंतरच निवडणुकीचे अंतिम चित्र स्पष्ट होईल.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींची 12 नोव्हेंबरला सोलापुरात होणार सभा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** लोकसभा निवडणुकीत 'सेट बॅक' बसलेल्या महाराष्ट्रावर भाजपने विशेष लक्ष केंद्रीत केले आहे. विधानसभा निवडणुकीसाठी पक्षाने मोठी ताकद लावली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे राज्यात पहिल्या टप्प्यात उत्तर महाराष्ट्रात सभा घेणार आहेत.

त्यानंतर मोदी यांची येत्या 12 नोव्हेंबर रोजी सोलापूर येथे महायुतीच्या उमेदवारांसाठी सभा घेणार आहेत.




लोकसभा निवडणुकीतील अपयशानंतर भारतीय जनता पक्ष खडबडून जागा झाला आहे. महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक जिंकण्यासाठी भाजपने कंबर कसली आहे, त्यासाठी प्रदेश पातळीपासून केंद्रीय नेतृत्वापर्यंत सर्वांच्या सभा महाराष्ट्रात होणार आहेत. त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभा विधानसभा निवडणुकीतील महत्वाचा फॅक्टर ठरण्याची शक्यता आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उत्तर महाराष्ट्रातील सभेने महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा नारळ फुटणार आहे. मोदींची महाराष्ट्रात पहिली सभा नाशिक आणि धुळे येथे होणार आहे. या दोन्ही ठिकाणी येत्या 08 तारखेला मोदी महायुतीच्या उमेदवारांसाठी सभा घेणार आहेत. नाशिकच्या पंचवटी परिसरातील मोदी मैदानावर पंतप्रधानांची सभा होणार आहे.

पुढील टप्प्यात नरेंद्र मोदी हे सोलापूरमध्ये सभा घेणार आहेत. शहरातील होम मैदानावर 12 नोव्हेंबर रोजी महायुतीच्या उमेदवारांसाठी मोदी सभा घेणार आहेत. भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी सोलापूर महापालिका, पोलिस प्रशासन आणि निवडणूक कार्यालयाकडे सभेसाठी परवानगी मागितली आहे.

दरम्यान, सोलापूर जिल्ह्यातील अकरा मतदारसंघांपैकी सहा मतदारसंघातून भाजप विधानसभेची निवडणूक लढवत आहे. अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, सोलापूर शहर उत्तर, सोलापूर शहर मध्य, माळशिरस आणि पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघात भाजपचे उमेदवार आहेत. भाजपच्या या उमेदवारांसाठी मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या सभा होणार आहेत.

विधानसभेच्या प्रचारासाठी भाजपकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सिनेअभिनेते पवन कल्याण, हैदराबादच्या माधवी लता यांच्या सभा होणार आहेत. प्रचारासाठी पाच नोव्हेंबरपासून 18 नोव्हेंबरपर्यंत केवळ 14 दिवसांचा अवधी मिळणार आहे. त्यात महाविकास आघाडी आणि महायुतीच्या नेत्यांच्या सभा होणार आहेत.

## पीक नुकसानीचे सर्वेक्षण अद्याप सुरूच

### शेतकऱ्यांना फटका



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** गेल्या महिन्यात पावसामुळे झालेल्या खरीप पिकांच्या नुकसानीची जिल्ह्यातील दोन लाख ७९ हजार ९२ शेतकऱ्यांनी पूर्वसूचना दिली आहे. मात्र, एक महिन्याहून अधिक कालावधी उलटूनही अद्याप नुकसानीचे सर्वेक्षण सुरूच आहे. उशिरा सर्वेक्षणामुळे प्रत्यक्ष नुकसानीची नेमकी माहिती मिळू शकत नसल्याने शेतकऱ्यांची अडचण होत आहे. जिल्ह्यातील सव्वासात लाख शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पीकविमा योजनेंतर्गत एक रुपये भरुन पाच लाख ४१ हजार ८७४ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित केले आहे. जिल्ह्यात सप्टेंबर महिन्यात झालेल्या पावसाने खरीप पिकांचे नुकसान झाले आहे. कृषी खात्याच्या आवाहनानुसार जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पीकनुकसानीची पूर्वसूचना दिली आहे. त्यानंतर ३३ हजार ४७ सॅम्पल सर्व्हे झाले असून ६३ हजार ८३९ पूर्वसूचना सर्व्हेक्षणयोग्य नसल्याने फेटाळण्यात आले आहेत. विमा कंपनीने एक लाख ८२ हजार २०६ नुकसानीचे सर्व्हेक्षण सुरू केले आहे. मात्र, सर्व्हेक्षण अजुन संपले नाही. पावसानंतर महिन्याहून अधिक कालावधी उलटूनही नुकसानीचे सर्व्हेक्षण पूर्ण झाले नाही. सर्व्हेक्षणासाठी कर्मचारी कधी येणार, या प्रतीक्षेत शेतकरी आहेत. ओरिएंटल विमा कंपनीने यासाठी नेमलेल्या कंपनीकडे पुरेसे मनुष्यबळ नसल्याने सर्व्हेक्षणाला विलंब होत आहे.

### १५ हजार शेतकऱ्यांची उशिरा पूर्वसूचना

खरीप पीक नुकसानीच्या ६३ हजार ८३९ पूर्वसूचना सर्वेक्षणायोग्य नसल्याने नाकारण्यात आल्या आहेत. त्यात १५ हजार ५४४ पूर्वसूचना विलंबाने दाखल झाल्या आहेत. चुकीच्या पूर्वसूचना २७ हजार १८३, पेरणी कालावधीतील ६५९, अपुरी माहिती असलेल्या एक हजार ४९०, विमा संरक्षणास अपात्र ११ हजार ८९१ पूर्वसूचना आहेत.

## संपादकीय

# प्रदूषण रोखा, आरोग्य राखा

देशाची राजधानी असलेली दिल्ली आता प्रदूषणाचीही राजधानी बनली आहे. दिल्लीतील प्रदूषणाने धोक्याची पातळी ओलांडली आहे. रविवारी राजधानी दिल्लीतील हवेचा दर्जा निदेर्शांक (ए क्यू आय) ४०० हून अधिक नोंदवला गेला त्यामुळे दिल्ली हे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर बनले आहे. अर्थात ही काय भूषणावह बाब नाही उलट यामुळे देशाची मान खाली झुकली आहे अर्थात त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही दिल्लीतील प्रदूषणावर नियंत्रण आणण्यासाठी ठोस उपाय करा असा अनेक सामाजिक व सेवाभावी संघटनेने सरकारला इशारा दिला होता मात्र सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले. केवळ दिल्लीतच नाही तर दिल्लीसह देशातील अकरा शहरांची ए क्यू आर म्हणजे हवेची गुणवत्ता ३०० च्या वर नोंदवली गेली. मुंबई शहरातील हवेची गुणवत्ता देखील खालावली असून मुंबई शहरावर धुक्याची चादर पसरली असून आग्यार्चा ताजमहालालाही प्रदूषणामुळे धोका निर्माण झाला आहे.

मागील वर्षी स्विस संस्था आयक्युएअरने जागतिक प्रदूषणावर एक अहवाल प्रसिद्ध केला होता. हा अहवाल भारतासाठी धक्कादायक होता कारण या अहवालात भारत जगातील आठव्या क्रमांकाचा प्रदूषित देश असून दिल्ली जगातील चौथ्या क्रमांकाचे प्रदूषित शहर असल्याचे नमूद करण्यात आले होते व त्याच अहवालात प्रदूषित शहरांच्या यादीत चौथ्या क्रमांकावर असलेली दिल्ली लवकरच पहिल्या क्रमांकावर पोहचेल असा इशाराही दिला होता. अवघ्या वर्षभरात त्यांचा इशारा खरा ठरला. स्विस संस्थेने तयार केलेल्या या अहवालाच्या निर्मितीसाठी वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम – २.५ कणांचे प्रमाण बारकाईने तपासण्यात आले होते. जगातील १३१ देशांमध्ये बसविण्यात आलेल्या ३० हजार ग्राउंड मॉनिटरच्या माध्यमातून ७३०० शहरांची माहिती संकलित करण्यात आली होती. या अहवालातील निष्कर्ष पाहिल्यानंतर भारतातील प्रदूषणाची समस्या किती गंभीर आहे हे लक्षात येईल. विशेष म्हणजे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत भारतातील दिल्ली, मुंबई, कोलकाता, हैदराबाद, चेन्नई यासारख्या मोठ्या आणि महत्वाच्या शहरांचा समावेश आहे. या शहरात वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम – २.५ कणांचे प्रमाण ५३.३ मायक्रोग्राम क्यूबिक मीटर या पातळीवर आले असून ते आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या सुरक्षेच्या पातळीपेक्षा दहापटीने अधिक असल्याचे दिसून आले आहे.

आज देशातील सर्वच महत्वाची शहरे प्रदूषणाने गुदमरत आहेत. त्या शहरात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन प्रदूषणामुळे धोक्यात आले आहे. एकीकडे २१ व्या शतकातील सुखासीन जीवनाचे मनोहरी चित्र उभे केले जात आहे. स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवले जात आहे तर दुसरीकडे याच शहरांची फुफ्फुसे प्रदूषणाने निकामी होत आहेत. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांना फुफ्फुसाचे, हृदयाचे, रक्ताभिसरणाचे आजार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. न्यूमोनिया, पक्षघात, हृदयविकार, फुफ्फुसाचा कर्करोग यासारखे मोठे आजार प्रदूषित हवेमुळेच होत आहेत. प्रदूषणामुळे दिल्लीसारख्या देशाच्या राजधानीची किती वाईट अवस्था झाली आहे हे आपण पाहत आहोतच. मागील वर्षी प्रदूषणामुळे दिल्लीतील शाळा कॉलेजसना सुट्टी देण्याची वेळ प्रशासनावर आली आली होती. चार वर्षापूर्वी दिल्लीत इंग्लंड आणि भारत यांच्यात झालेल्या कसोटी सामन्यात खेळाडू चक्क मास्क लावून मैदानात उतरले होते. नंतर हा सामना देखील प्रदूषणामुळे रद्द करावा होता त्यामुळे भारताची जगात नाचक्की झाली होती. जे दिल्लीत आहे तेच मुंबईत आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई प्रदूषणाच्या बाबतीत देशाच्या राजधानीची बरोबरी करू लागली आहे. मुंबईचे प्रदूषणही उच्चतम पातळीवर पोहचले आहे.

प्रदूषणामुळे लोकांना शुद्ध हवा मिळणे दुरापास्त झाले आहे. शुद्ध हवेसाठी लोकांना पैसे मोजावे लागत आहे. मुंबई – दिल्लीसारख्या मोठ्या लोकसंख्येच्या शहरात ऑक्सिजन बार सुरू करण्यात आले आहेत. एका तासाला २०० ते ५०० रुपये मोजून नागरिक ऑक्सिजन विकत घेत आहेत. इतके होऊनही आपण त्यातून बोध घेत नाही. या मोठ्या शहरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या मोठ्या शहरात लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणात भर पडत आहे. वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरात प्रदूषणाचे प्रमाण खूप असते. धूळ, कारखान्यातून निघणारा धूर, बांधकामातून पसरणारे कण, वृक्षतोड, पृथ्वीचे वाढते तापमान, प्लास्टिकचा भस्मासुर अशा अनेक कारणांमुळे प्रदूषणाचा आलेख उंचावत आहे.

स्विस संस्थेने जाहीर केलेला अहवाल म्हणजे धोक्याची घंटा आहे. वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी वेळीच ठोस उपाय करायला हवेत. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या धुरातून प्रदूषणकारी घटक कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. दगड खाणींवर नियंत्रण आणायला हवे. वाहनांची संख्याही कमी करायला हवी. प्रसंगी सम – विषम सारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत. युरोपीय देशात प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना केल्या जातात याचा अभ्यास करायला हवा. नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. याशिवाय कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि विल्हेवाट तसेच सौरऊर्जेच्या वापरावर भर द्यायला हवा. वृक्षारोपण करुन ते वृक्ष जगवले पाहिजेत. शासन, प्रशासन आणि नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच प्रदूषणाचा हा भस्मासुर रोखता येईल.

# काय आहे दिवाळी सणाचा इतिहास?

भारतातील बहुतांश सण हे आर्य–अनार्य म्हणजेच सूर–असुर यांच्या संघर्षाच्या स्मृती आहेत. उदा तुळशी विवाह, बलिप्रतिपदा, दसरा इत्यादी. त्याचप्रमाणे नरक चतुर्दशी हा दिवसदेखील अभिमान बाळगावा असा आहे. नरक चतुर्दशी हा सण अनार्य, असुर म्हणजे भारतीयांच्या अस्मितेचा सण आहे. शेतीची कला अवगत असणाऱ्या समुहाला ऋग्वेदात अब्राह्मण असे म्हटले आहे, याचा दुसरा अर्थ असा होतो की ज्यांना शेतीची कला अवगत नव्हती त्यांना ब्राह्मणी समुदाय म्हटले जाते, त्यामुळे ब्राह्मणी–अब्राह्मणी हे शब्द जातीवाचक किंवा द्वेषमूलक नाहीत, तर हे दोन शब्द भारतातील सांस्कृतिक संघर्ष दर्शवतात, त्यामुळेच जगविख्यात प्राच्यविद्यापंडित शरद पाटील हे वेदांच्या आधारे त्यांच्या तत्वज्ञानाची मांडणी "ब्राह्मणी–अब्राह्मणी" अशीच करतात.

आर्य, सूर म्हणजे विदेशी लोक होत. या थेअरीला जसे ऐतिहासिक, प्राच्यविद्येत संदर्भ आहेत, तसेच पुरातत्त्वीय संदर्भदेखील आहेत. आर.एस.शर्मा, मॉर्टीमर व्हीलर, गॉर्डन चाईल्ड हे अनेक इतिहासकार, पुरातत्वशास्त्रज्ञ यांनी याबाबत विस्ताराने मांडलेले आहे. याबाबत जेन. एन. पांडे यांचा पुरातत्वविमर्श हा ग्रंथ महत्त्वपूर्ण आहे.

स्वर्ग–नरक या संकल्पना वास्तव नाहीत. त्या काल्पनिक आहेत, असे चार्वाक तत्त्वज्ञान सांगते. वर्धमान महावीर, गौतम बुद्ध, संत तुकाराम महाराज यांनी स्वर्ग–नरक या कल्पना नाकारलेल्या आहेत. गरिबांना स्वगार्चे आमिष आणि श्रीमंतांना नरकाची भीती दाखवून लुटण्यासाठी स्वर्ग–नरकाच्या कल्पना आल्या, हे स्पष्ट होते. स्वर्ग–नरक रिटर्न अशी कोणीही व्यक्ती अजून जगात कोणालाही भेटलेली नाही. जसा स्वर्ग अस्तित्वात नाही, तसेच नरकदेखील अस्तित्वात नाही.

नरक जर वास्तवात नसेल तर ही संकल्पना आली कोठून, त्याची युत्पती काय आहे ? याचा शोध प्रथमतः प्राच्यविद्यापंडित शरद पाटील यांनी लावला. आर्यांच्या आक्रमणाचा प्रतिकार करणारे अनेक असुर गण भारतात होते, त्यापैकीच 'नर' गणाचे असुर लोक होते. ते खूप कष्टाळू, प्रामाणिक आणि शूर होते. ते कृषक होते. त्यांना शेतीची कला अवगत होती. नरक गणाच्या मातेचे नाव भूदेवी होते. म्हणजे हा कृषक गण होता. त्यांनी उत्तम शेती केली, धरणे बांधली, किल्ले बांधले, उत्तम प्रशासनव्यवस्था निर्माण केली. गाळपेऱ्याच्या शेतीनंतर असुर हे सामुदायिक शेतीत उतरले, कारण वाढती लोकसंख्या, शेतीचे अवगत झालेले प्रगत तंत्रज्ञान होय. असुर लोक हे अत्यंत लोककल्याणकारी होते. आर्यांच्या आक्रमणामुळे ते दक्षिणेकडे सरकलेले आहेत. असुर राजा बळी हा पाताळात म्हणजेच दक्षिणेकडे आलेला आहे. पाताळ म्हणजे केरळ, तमिळनाडू हा भाग होय. त्याच्या स्मृती आपण भारतीयांनी ओणम, बलिप्रतिपदा या सणाच्याद्वारे जतन करून ठेवलेल्या आहेत. दक्षिणेत सरकलेल्या 'नर' नावाच्या असुरांनी सिंचनव्यवस्था निर्माण करून 'कटाची' शेती केली. कटाची शेती म्हणजे गणाची सामुहिक शेती होय. सामूहिक शेती करणाऱ्या नर गणाच्या असुर लोकांचा समुदाय म्हणजेच 'नरक' होय. (नर+कटाची). त्यातील अधिक प्रगत लोकांचा गण म्हणजे 'वानर' गण होय. वानर हे जंगलात सरकती शेती करणारे, एका शेती मौसमात एका ठिकाणी, तर दुसऱ्या मौसमात दुसऱ्या ठिकाणी शेती करत असत. त्यामुळे जंगलाची नासधूस होत नसे. जंगल साफ करून म्हणजेच जंगल जाळून व्यापक शेती करणारा गण म्हणजे *वैश्वानर* गण होय. वैश्वानर आर्यांच्या अंकित झाल्यामूळे समुळ जंगले जाळून नव्या वसाहती निर्माण करण्यास ते आर्यांना मदत करु लागले. याबाबतची विस्तारित मांडणी प्राच्यविद्येचे अभ्यासक राजकुमार घोगरे यांनी केलेली आहे.

नरक गणातील राजे खूप महान होते. नरक गणातील असुर लोकांचा अभिमान वाटावा, इतके ते प्रगत आणि मानवतावादी होते. ते लुटारू, क्रूर, विध्वंसक नव्हते, तर शेतीत काबाडकष्ट करून जगणारे व इतरांना जगविणारे कर्तृत्ववान लोक होते. ते ऐतखाऊ नव्हते, तर श्रम करून जीवन जगणारे, नवनिर्मिती करणारे लोक होते. उदाहरणार्थ बळीराजा, जालंधर, हिरण्याक्ष इत्यादी. भारतीयांनी अशा लोकांचा अभिमान बाळगला पाहिजे, इतके ते महान होते, म्हणूनच त्यांची आठवण आपण 'नरक चतुर्दशीच्या' रूपाने जिवंत ठेवलेली आहे. आपण त्यांच्या नावाने दिवाळी साजरी करतो. दिवाळीतील प्रत्येक दिवस हा कर्तृत्ववान असुर लोकांच्या कार्यकर्तृत्वाचा जयजयकार करणारा दिवस आहे.

आम्ही लहानपणी दिवाळीच्या वेळेस सकाळी लवकर नाही उठलो, की वडील म्हणायचे "लवकर उठून आंघोळ करा, उशिरा उठलात तर नरकात जाल." नरकात जायच्या भीतीने आम्ही सूर्योदयापूर्वीच आंघोळ करायचो. कारण नरकात वाईट लोक जातात, तेथे त्यांचा खूप छळ केला जातो, तेथे रवरव नरक असतो, अशा पुराणकथा ऐकल्या होत्या.

नरक जर खरच वाईट असता तर नरक चतुर्दशीला आपण दिवाळी साजरी केली असती का ?. पण आता आम्ही म्हणतो आंघोळीला उशीर झाला तरी चालेल, कारण नरक गणातील लोक आपले पूर्वज आहेत, नरक हा पृथ्वीवरच आहे. आपण कृषिसंस्कृतीतील लोक त्यांचे वारसदार आहोत. आपल्या लोकांत म्हणजे नरकात राहायला नक्की आवडेल.

गाय हा सर्वार्थाने उपयुक्त पशू आहे. दुसरे नागरीकरण गंगेच्या खोऱ्यात झाले. त्यादरम्यान जगात लोखंडाचा (इसपू १० वे शतक) शोध लागला. त्यामुळे मानवी जीवन अधिक वेगवान झाले. गंगेच्या खोऱ्यात जंगल साफ झाले. शेती करण्यासाठी मनुष्यबळ अपुरे होते. त्यावेळेस गोधन मदतीला आले. आर्य तर यज्ञात गायींचा बळी देत होते. ते गोमांसभाक्षक होते याबाबत The myth of The Holy Cow या अभिजात ग्रंथात Dr. D. N. Zha यांनी विस्ताराने लिहिले आहे. महावीर–बुद्ध हे कृषी संस्कृतीतून आले असल्यामुळे ते यज्ञाविरूद्ध गोरक्षक म्हणून उभे राहिले, ते अध्यात्मिक कारणाने नव्हे, तर भौतिक कारणाने उभे राहिले. त्यामुळे गोभक्षक आर्यांना नाईलाजाने शाकाहारी व गोरक्षक व्हावे लागले. महावीर आणि बुध्दाने रक्षण केलेली गाय आपल्या संस्कृतीचा वारसा आहे. तो आपण दिवाळीत 'वसुबारस' या रुपाने जतन करतो.

लक्ष्मीपूजन हा तर स्त्री संस्कृतीचा सन्मान आहे. शेतीचा शोध स्त्रियांनी लावला. भटक्या मानवाला खात्रीचे अन्न, राहण्यासाठी घर स्त्रियांनी दिले. स्त्रियांनी खात्रीचे स्थिर जीवन दिले अर्थात अन्न, गावं आणि घर दिले, हे पुरुषांनी कधीही विसरू नये. अतिरिक्त धान्य आले. त्यामुळे मानवी जीवन स्थिर झाले. बरकत आली. मानवी जीवनात भरभराट आली, ती भरभराट स्त्रीपावलाने म्हणजेच लक्ष्मीच्या पावलांनी आली. हा स्त्री सन्मानाचा उत्सव आहे. हा स्त्री स्वातंत्र्याचा उत्सव आहे. स्त्री ही हिम्मतवान, कर्तृत्ववान, बुद्धिमान आहे. ती पुरुषापेक्षा अधिक सृजनशील आहे. तिच्याकडे प्रसवक्षमता आहे. म्हणूनच निसर्गाने अपत्यप्राप्तीची जबाबदारी स्त्रीकडे दिलेली आहे. तिच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे म्हणजे 'लक्ष्मीपूजन' होय. लक्ष्मीपूजन हे शेतीचा शोध लावणाऱ्या निऋतीचे पूजन आहे.


आयुर्वेदाचा प्रवर्तक धन्वंतरी याच्याप्रती कृतज्ञता म्हणून 'धनत्रयोदशी' आली, असेही मानले जाते. सम्राट अशोक, सम्राट चंद्रगुप्त यांचा विजयोत्सव म्हणून दीप म्हणजे दिवा लावण्याची परंपरा आहे, असे म्हटले जाते. पाताळयंत्री, कपटी आणि क्रूर वामनाने लोककल्याणकारी बळीला छळले, जसे औरंगजेबाने शिवरायांना छळले. शिवाजीराजे मागे हटले नाहीत. बळीराजा मागे हटला नाही. बळी हा जनतेला आनंद देणारा राजा होता. त्याच्या राज्यात प्रजा सुखी होती. कोणत्याही प्रकारची उणीव नव्हती. म्हणून म्हटले जाते 'इडा पिडा टळो' बळीचे राज्य येवो''. आजही प्रजा बळीच्या आगमनाची, त्याच्या लोककल्याणकारी राज्याची वाट पाहत आहे. त्या लोकप्रिय बळीराजाचे स्मरण म्हणून आपण 'बलिप्रतिपदा' हा दिवाळीचा महत्त्वाचा दिवस साजरा करतो.

बहीण भावाने एकमेकांच्या मदतीला सतत धावून आले पाहिजे. बहीण भाऊ हे सहोदर आहेत. त्यामुळे त्यांचे नाते अतूट आहे. ते सतत वृद्धिंगत राहावे, हाच संदेश दिवाळीत *भाऊबीज* हा सण देतो. अशा अनेक कल्याणकारी अथार्ने ओतप्रोत भरलेला आनंददायी सण म्हणजे दिवाळी आहे. ही आनंदाची दिवाळी आहे. अंधकार दूर करून जीवनात प्रकाश निर्माण करणारी ही दीपावली आहे.

संत ज्ञानेश्वर म्हणतात
"की अविवेकाची काजळी '
फेडूनिया विवेकदीप उजळी ''
योगिया पाहे दिवाळी' निरंतर" ''

विवेकाचा–ज्ञानाचा दिवा लावून अविवेकाची–अज्ञानाची काजळी नष्ट करणे, हीच खरी दिवाळी आहे, असे संत ज्ञानेश्वर म्हणतात.

अशा दिवाळीच्या सर्वांना शुभेच्छा!



–डॉ.श्रीमंत कोकाटे

## प्रबोधन

# दिवाळी धनिकांची

दसरा सण मोठा नाही, आंनदा तोटा ही ओळ ऐकून आश्चर्य वाटण्याची गरज नाही. कारण घटस्थापनेपासून कार्तिक महिना संपेपर्यंत दोन महिन्यांचं एक सलग आनंदपर्वच आहे. ते वेगवेगळ्या ठिकाणी वेगळी रूपं धारण करतं. शेतकऱ्यांची दिन दिन दिवाळी, गाईम्हशी ओवाळी ही वेगळी अमावस्येच्या मध्यरात्री लक्ष्मीपूजन करणाऱ्या व्याजभोगी, शेठ–सावकारांची आत्मतुष्ट, सावध 'शुभ–लाभ' छाप दिवाळी वेगळी आणि बोनससह, पोस्तसह पगार वसूल करणारी नोकरचाकरांची जिवाची मुंबई छाप किंचित चंगळवादी दिवाळी वेगळी. यापेक्षा लाजेकाजेस्तव कर्ज काढून आपल्या कपड्यांना ठिगळ लावून लेकरांची नवी कापडं डोळ्यात आनंदाश्रू आणून पाहाणारी गरिबांची ओढगस्तीची दिवाळी खूपच वेगळी आहे. तर लाडू–करंज्याची भीक आता मिळणार म्हणून आसुसलेल्या भिकाऱ्यांची बुभूक्षित दिवाळी वेगळी आहे. दिवाळीच्या स्वरूपाचं हे वैविध्य विचारी माणसाला अंतर्मुख करतं.

विरागी असूनही संतश्रेष्ठ तुकोबा दसरा–दिवाळीचं महत्त्व मानतात. मात्र त्याचा सण सामान्यांच्या सणाहून पुन्हा वेगळाच आहे. सामान्यांना लाडू–करंजा खाणे म्हणजे दिवाळी वाटते, तर तुकोबांना साधुसंत येती घरा । तोचि दिवाळी दसरा–असं वाटतं. तुकोबांचंही बरोबरच आहे. कारण लाडूची गोडी जिभेला पाच मिनिटं जाणवेल, पण साधुसंत अर्थात सज्जनांच्या संगतीची गोडी आयुष्याला पुरून उरते. दुसऱ्या एका अभंगाचाही आशय असाच आहे. ते म्हणतात, दसरा–दिवाळी तोचि आम्हा सण । सखे संतजन भेटतील ॥ अंतर्बाह्य शुद्ध चारित्र्याची माणसं या जगात दुर्मिळच आहेत. हे सज्जन काल्पनिक देवाहून फार थोर आहेत, असा एक विचार व्यक्त करताना ते म्हणतात, करिता देवार्चन, घरा आले संतजन । देव सारावे परते, संत पुजाचे आरते। सज्जनांचा सहवास आणि दिवाळीचा आनंद सारखाच आहे.

पण जगात अशा सज्जनांची संख्या अत्यल्प असते म्हणून तर जग दुःखाने भरलेलं आहे. स्वार्थ, लबाडी, फसवणूक, विश्वासघात हेच जगात अधिक! व्यवहारातही अंधार आणि मनाच्या गुहेतही अंधार! अशावेळी तीव्रतेने प्रकाशाची गरज जाणवू लागते. विवेकानंद म्हणतात, 'जगाला कोण प्रकाश देईल? जो आत्मत्याग करील ते! हाच प्राचीन दंडक आहे आणि तोच यापुढेही युगानुयुगे चालत राहाणार आहे. या पृथ्वीवरील सर्वात पराक्रमी आणि सर्वश्रेष्ठ लोकांना बहुजन हिताय, बहुजन सुखाय आत्मबलिदान करावेच लागेल. अंतःकरणात अनंत प्रेम आणि दया असलेले शेकडो बुद्ध आज हवे आहेत.'

दुरिताचे तिमिर जावे म्हणून सत्यनिष्ठ महात्मा फुले, महात्मा गांधी यांसारख्या थोर महात्म्यांनी आत्मबलिदान केलंय. आज जगात 'स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाचा' जो थोडा वैचारिक प्रकाश दिसतो आहे, तो वरील महात्म्यांच्या त्यागामुळेच! अन्यथा जगात दारिद्र्य, अज्ञान, अंधविश्वास, पाशविकतेचा नंगानाच दिसला असता. सर्वांस सुख लाभावे, तशी आरोग्यसंपदा, कल्याण व्हावे सर्वांचे कोणी दुःखी असू नये ही समाजहितैषी भूमिका जगाच्या कल्याणासाठी, परोपकारासाठी आपला देह स्वखुशीने झिजवणाऱ्या थोरपुरुषांनी सतत बाळगली. म्हणून आपण दीपावलीत त्यांच्या कार्याची आठवण म्हणून दिवे लावतो. दीपोत्सव करतो. हे प्रकाश देणारे, अंधार पळवून लावणारे, मनात आशावाद रुजवणारे दिवे त्या थोर पुरुषांच्या जीवनाचे प्रतीक आहेत. सुखाचा उपभोग घ्या, पण त्या सुखात इतरांनाही सामावून घ्या. असा संदेश त्या थोर महात्म्यांनी दिला आहे.

विवेकानंद म्हणतात, ह्यप्रत्येक वस्तूचा पहिला वाटा गरिबांना मिळाला पाहिजे. आपला हक्क केवळ उरलेल्यावर आहे. आर्त आणि गरीब हे साक्षात ईश्वराचे प्रतिनिधीच होत. '

दिवाळीचा आनंद ज्यांच्या वाट्याला आला आहे, अशांनी विवेकानंदांसारखा विचार कधीतरी केला आहे का? ते गरिबाला भिकारडे मानतात आणि दगडाला ईश्वर मानतात. गरिबांना जगात जगण्याचा हक्क नाही, असे त्याचे वागणे–बोलणे असते. प्रत्येक उत्पादनातील पहिला हिस्सा आपला! उरलेल्यावर, टाकून दिलेल्यावर गोर–गरिबांचा अधिकार अशी त्यांची मिजास असते. दुःखितांचे दुःख त्यामुळे वाढते. त्यातूनच मग हिंसेचे जंतू आकारास येतात, वाढतात आणि पसरतात. परिणामी, अव्यवस्थेची आणि असामाजिकतेची अमावास्या गडद काळी होऊ लागते. अशा वेळी तसमो मा ज्योर्तिगमयची अशक्त इच्छा तेल संपलेल्या दिव्यासारखी विझू लागते. आणि आपण आपल्या त्यागाचे तेल या दिव्यात घालण्यासाठी कुणी महात्मा येईल का, याची वाट पाहू लागतो, एक क्षीणज्योत पणती पाजळून! कारण–

श्रीमंतांचे दिवे । जळती अखंड`
गरिबांचे थंड होती सदा ॥१
दिवाळी एकाची। स्वगार्तून येते ।
शिव्यातून येते। दुसऱ्याची ॥२
आनंदाचा रंग गडद नि फिका ।
का एकसारखा। असू नये ?` ३
स्वर्गा पराभूत। करितो नरक ।
शहाण्यास दुःख । हेच देई ॥४
स्वाथार्ने जगाला। अवकळा आली ।
शोषणाची काळी । रात्र मोठी ॥५
दिवाळीचे दिवे । तरी हसतात ।
धीरही देतात। मरत्याला ॥६
जाईल ही वेळ । मनी हाच मेळ ।
जीवनाचा खेळ। रंगवितो ॥७
हास्यकल्लोळात । विरती हुंदके ।
गर्दतसे धुके। दिवाळीचे ॥८
दीपोत्सव लाभो । ज्याचा असे त्यास ।
हसू या उदास। जरी मन॥९



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर–416012
92258 09071

# मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी सुट्टी अथवा दोन तासांची सवलत द्यावी – जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर जिल्हयातील विधानसभा मतदार संघ क्षेत्रात मतदानाचा हक्क बजावण्यासाठी योग्य संधी प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने या क्षेत्रात असलेल्या मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी सुट्टी अथवा दोन तासांची सवलत देण्याबाबत उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दि 24 नोव्हेंबर 2024 रोजी च्या परीपत्रकान्वये कळविले आहे. मतदानाच्या दिवशी सुट्टी दोन तासाची सवलत हि उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने दुकाने इत्यादीना लागू राहील. सोलापूर विधानसभा सार्वत्रीक निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर सोलापूर जिल्हयातील खाजगी कंपन्या मधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे नाटय गृहे व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स इत्यादीना सुचना देण्यात येत आहे कि, दि.20 नोव्हेंबर 2024 रोजी मतदानाच्या दिवशी कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सार्वजनिक सुट्टी देण्यात यावी.

जर अपवादात्मक परिस्थितीत उत्पादन प्रक्रीयेतील कारखाना सुरु ठेवून मतदानासाठी केवळ दोन ते तीन तासांची सवलत देण्याबाबत मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांची पुर्व परवानगी घेणे आवश्यक असून त्यांच्या परवानगीनेच दोन तासांची सवलत देता येईल. कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन ते तीन तासांची सवलत मिळेल याची दक्षता संबधित अस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहील.

असे आवाहन मा. जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी आवाहन केले आहे.

# ग्रामीण भागात वाढत्या वाळु माफीयावर वर आशीर्वाद कुणाचा. ...! वाळू माफियांवर नियंत्रण कधी ?

## महसूल व पोलीस प्रशासनानाची डोळेझाक, रात्रीच्या अंधारात व भरदिवसात वाळु उपसा व विक्री जोरात

**अकोला (कटूसत्य वृत्त):–** अकोला जिल्ह्यातील बाळापुर तालुक्यात अंतर्गत उरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या ग्रामीण परीसरातील अवैध वाळू माफियांवर ठोस कारवाई केव्हा?

लोहारा . कवढा. हाता . डोंगर गाव या परिसारात महसूल मंडळात वाळू माफियांचा सुसाट झाले असुन या अवैध व्यवसायात सर्वात अधिक जोर धरलेली वाळूची तस्करी रोखण्यात प्रशासनाला अद्यापपर्यंत अपेक्षित असे यश आलेले नाही. वाळूची तस्करी करणारे मुजोर झाले असून राजरोसपणे वाळूचा उपसा केला जात आहे. वाळू माफिया उरळ व महसून विभागातील अधिकाऱ्यांचे यांचे खिशे गरम करत असल्याचे जनसामान्य नागरिकांमध्ये चर्चा चचेर्ला उधान आले आहे. सध्या विधानसभेचे आचारसंहिता व चेक पोस्ट प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी लावलेले असून ही संधी वाळूची तस्करी करणारे वाळू माफिया चांगल्या तऱ्हेने या संधीचा फायदा घेऊन वाळूची तस्करी करणाऱ्यांनी शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. असल्याचेकरुण सर्व सरकारी नियम धाब्यावर बसवून रात्री अंधाराचा फायदा घेत वाळू उपसा



चालू आहे. याविषयीची माहिती महसूल विभागाचे अधिकारी आणि पोलीस यांना असून सुद्धा त्याकडे दुर्लक्ष का केले जाते ? पोलीस यंत्रणा काय करत असते ? गावातून वाहने बाहेर कशी सोडली जातात? असे अनेक प्रश्न यापरिसारात उपस्थित होतात.

अवैध वाळू उपसा रोखण्यासाठी पथकावर अनेकदा तस्करांकडून सशस्त्र आक्रमण केले गेल्याच्या घटना अनेक ठिकाणी घडल्या आहेत. त्यांच्याकडे शस्त्रे कुठून येतात ? पोलीस प्रशासन, महसूल विभागाचे पथक कारवाईसाठी येणार असल्याची माहिती या वाळु चोर माफियांना कशी मिळते ? तसेच कायदा–सुव्यवस्था मोडीत काढण्याचे धाडस या लोकांकडे कुठून येते ? असेही प्रश्न उपस्थित होत जाहे. वाळू उपसा बंदीचा कायदा असूनही या वाळु माफीयावर कठोर कारवाई का होत नाही.

अवैध वाळू उपसा करर्णायांना एकाला तरी कठोर शिक्षा झाली, असे अद्यापपर्यंत ऐकण्यात आले नाही. मग वाळु उपसा व विक्री करर्णायांवर महसुल व उरळ पोलिसांचा धाक कसा रहाणार असा प्रश्न उपस्थित झाला आहे?

जो तो आपली पोळी भाजून घेत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे यामध्ये पोलीस प्रशासन आणि महसूल विभाग यांचे वाळू तस्करांशी धागेदोरे असण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या यंत्रणेला आळा बसण्यासाठी कठोर कायदा करून कठोर कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

# सोलापूर जिल्ह्यातील प्रतिष्ठित अशा व्ही.आर. पवार सारीज शोरूम मध्ये आज लक्ष्मीपूजन संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** साडी क्षेत्रात अत्यंत नावाजलेल्या महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या व्ही. आर. पवार साडी शोरूम मध्ये आज लक्ष्मीपूजन संपन्न झाले. सोलापूर जिल्हा सह लातूर, धाराशिव तसेच तीनशे किलोमीटर परिसरात अत्यंत नावाजलेले साडी शोरूम म्हणजे व्ही आर पवार सारीज शोरूम होय.

लग्न मस्त असा आहे ना च्या साड्या तसेच सुंदर शालू म्हणजे विहार पवार साहेब होय असे स्लोगन ग्राहकांच्या मनात प्रतिबिंबित झालेल्या या साडी शोरूम मध्ये खरेदीसाठी प्रचंड गर्दी महिला करीत असतात.

सध्या सणासुदीच्या दिवसाबरोबरच लग्न करायचे घाई देखील सुरू आहे त्यामुळे शा लो का व इतर साधन करिता खरेदीची झुंबर उडत असल्याचे दिसत आहे ज्यांना लग्न असे आवाहन व्ही. आर. पवार तर्फे करण्यात आले आहे. यावेळी लक्ष्मीपूजन करत असताना रमेश पवार व मुख्य व्यवस्थापक राजेश पवार, अमर पवार, महेश पवार आणि गिरीश पवार सोबत कुटुंबीय.



## वात्रटिका

### तेच ते जथ्थे

आज दिसले इथे तेच
कालही होते तिथे...
सगळ्यांच्या सोबत तेच
ते आहेत जथ्थे...
जोर लावून आवेशात
त्यांचा जयजयकार असतो...
हार झाली की लगेच पलटी
आणि मग धिक्कार असतो...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# देवेंद्र कोठे यांनी लोधी समाज बांधवांची घेतली बैठक



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहर मध्य विधानसभेचे महायुतीचे अधिकृत उमेदवार देवेंद्र कोठे यांच्या प्रचारार्थ लोधी समाज बांधवांची बैठक पार पडली या बैठकीत दिवाळी निमित्त फराळ कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते बैठकीत एकमताने महायुतीचे उमेदवार मा. देवेंद्र दादा कोठे यांना बहुमताने निवडून आनण्याचा संकल्प घेण्यात आला या बैठकीचे नियोजन नागनाथ शिवसिंगवाले, रणजीत हजारीवाले यांनी केले होते या बैठकीला समाजाचे जेष्ठ मकाराम काका कलबुर्गे, सोबुराम शिवसिंगवाले, मा.नगरसेवक रवि कैय्यावाले, मन्नूसिंग बाबावाले, बन्सी कैय्यावाले, शितल हजारीवाले, गुलाबसिंग अंबेवाले, मोहन दवेवाले, बन्सीसिंग मनसावाले, गुलजार शिवसिंगवाले, अमरसिंग दवेवाले, रवि बुव्हाणपुरे, सिताराम तुक्कुवाले, देविदास चौधरी, सुरेश हजारीवाले, दशरथ बिरबानवाले, मुकेश गोर्लेवाले, रमेश बंबेवाले, गणेश बुऱ्हाणपूरे, राम वटवटवाले, कन्हैया खंडेवाले, सुरेश बिलोरेवाले, विजय कैय्यावाले, सुरेश गोलेर्वाले, सज्जन बुऱ्हाणपूरे, आनंद मनसावाले, राजेश शिवसिंगवाले, राहुल मनसावाले, शुभम चौधरी, आनंद फत्तेवाले, बबलू राजपूत इ कार्यकर्ते व नागरीक उपस्थित होते.

# माढ्यात दौंड कलबुर्गी रेल्वे सुरु, माढा प्रवासी संघाने केले रेल्वेचे स्वागत



**माढा (कटूसत्य वृत्त):-** दौंड-कलबुर्गी - दौंड डेमो ही गाडी दिवाळी सणानिमित्त सोमवारपासून सुरू करण्यात आली आहे. माढा येथे दौंड ते कलबुर्गी या दिवाळी विशेष रेल्वे गाडीचे रेल्वे स्थानकावर आगमन होताच माढा प्रवासी संघटनेकडून लोकोपायलट यांचा पेढा भरवून स्वागत करण्यात आले. पाच वर्षापासून बंद असलेली गाडी सुरू झाल्याने विद्यार्थी, नोकरदार व व्यावसायिक यांच्याकडून आनंद व्यक्त होत आहे.

रेल्वे संघटनेच्या वतीने या प्रश्नी पाठपुरावा केला होता. कायमस्वरुपी गाडी सुरू करण्याची मागणी रेल्वे संघटनेच्या वतीने करण्यात आली होती. या मागणीला यश आले आहे.

सदर गाडीला माढा रेल्वे स्टेशनला थांबा देण्यात आलेला आहे. या गाडीने केम, कुर्डुवाडी, माढा, मोहोळ, सोलापूर, दुधनी, तिलाटी, गाणगापूर, कलबुर्गीकडे जाणाऱ्यांसाठी विशेष फायदा होणार आहे. तसेच भिगवण, पारेवाडी, दौंड येथे ही संध्याकाळी जाता येणार आहे. सदर गाडी सकाळी माढा येथे सकाळी साडेसात वाजता येणार असून ती सोलापूरला सकाळी ८:४० मी.वाजता पोहोचते व सायंकाळी सोलापूरहून ६:४० मिनिटांनी निघून रात्री साडेसात वातजा पोहोचते. त्यामुळे या गाडीचा फायदा गाणगापूर देवदर्शनासाठी तसेच सोलापूरकडे जाणाऱ्या प्रवाशांना होणार आहे.

**Format C-1**

**Declaration about criminal cases,**
(As per the judgement dated 25th September 2018 of the Hon'ble Supreme Court in WP(Civil) no. 536 of 2011( Public interest foundation and Ors. Vs Union of India & Anr.)

**Name and Address of candidate : Deshmukh Subhash Sureshchandra**
**13 A, Sahyadri Nagar, Vikas Nagar, Hotagi Road,**
**Solapur -413003.**
**Name of Political Party:Bharatiya Janata Party**
**Name of the Election: Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of the Constituency : 251, Solapur South, Solapur.**

I Deshmukh Subhash Sureshchandra a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

(A) Pending criminal caces

| Sl. No. | Name of the Court | Case No. and Dated | Status of Case(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1. | CJM Court, Solapur. | Cri.M.A. 767/2024 | Case has been Disposed Off on 14.10.2024, uncontested/rejected by the Court. | Offence Under Sec. 353,188,268,269 of IPC & U/s 51(1) of Epidemic Act under CR No. 285/2021, in the Sadar Bazar Police Station, Solapur. |
| 2 | CJM Solapur. | SCC No. 4145/2023 | Case is pending for Ist Order, Next Date | Offence Under Sec. 188, 269, 270 of the IPC & Under Sec. 51(B) of Disaster Management Act and Under Sec. 135 of Maharashtra Police Act, Under FIR No. 218/2021 in Fouzdar Chavdi Police Station, Solapur. |
| 3 | 9th CJ JD/JMFC Solapur. | S.C.C. 6199/2023 | The Case is Withdrawn by the Government I.e., Complainent. | Offence Under Sec. 188, 269, 270, 336 of the IPC & Under Sec. 51(B) of Disaster Management Act and Under Sec. 135 of Maharashtra Police Act, Under FIR No. 777/2021 in Fouzdar Chavdi Police Station, Solapur. |
| 4 | 11th CJ JD/JMFC Solapur. | S.C.C. 2461/2023 | The Case is Disposed on 01.05.2023in Lokadalat | Offence Under Sec. 188 of the IPC & Under Sec. 51(B) of Disaster Management Act and Under FIR No. 220/2020 in Sadar Bazar Police Station, Solapur. |
| 5 | Jt. CJSD & ACJM, Pandharpur | R.C.C. 201/2015 | Case is staid Stayed by Hon'ble High Court, Mumbai. Hence Stayed from 03.06.2019 | Offence Under Sec. 420,409,417,418,434 of IPC, CR No. 1/2014 in Pandharpur City Police Station, Dist.Solapur |
| 6 | Jt. C.J.J.D. /JMFC Kalam | S.C.C. 518/14 | Case is Disposed of uncontested Under Sec. 258 of Cr.P.C. on 30.07.2021 | Offence Under Sec. 188, of IPC, CR No. 24/2014 in Kalam Police Station, Dist. Dharashiv |
| 7 | Jt. CJJD/ JMFC, Tuljapur | S.C.C. 716/2010 | Case is contested and defended and after full hearing the accused was acquitted on 29.12.2015 | Offence Under Sec. 188 of IPC, CR No. 47/2010 in Tuljapur Police Station, Dist. Dharashiv |
| 8 | Not Applicable | Not Applicable | Chargesheet has not been yet filed by Police Station. | Offence Under Sec. 51B of Disaster Management Act, 2005 & Epidemic Diseases Act, 1897 (3), IPC 1860, IPC (188), IPC 1860 of IPC, & Sec. 135 of Maharashtra Polilct Act, 1951 CR No. 603/2021 in Fouzdar Chavdi Police Station, Solapur. |
| 9 | 9th CJJD & JMFC | S.C.C. 5133/2021 | Case is disposed off uncontested on 29.04.2024 Under Sec., 258 of Cr.P.C. | Offence Under Sec. 51B of Disaster Management Act, 2005 & Epidemic Diseases Act, 1897 (3),& Sec., 188m, 269,270,271 & 3336 IPC 1860 of IPC, & CR No. 920/2020 in Fouzdar Chavdi Police Station, Solapur. |
| 10 | JMFC Court Pandhapur | S.T.C. 276/2009 | Case has been disposed off. | Offence Under Sec. 127 A of Representation of people Act and Sec. 135 of Maharashtra Police Act, 1951 CR No. 14/2009 in Pahdharpur Taluka Police Station - 6 , Dist. Solapur |
| 11 | 9th CJJD & JMFC | Cri.M.A. 2897/18 | Case has been disposed Off Dt. 01.01.2019, uncontested I.e., disposed off otherwise. | Offence Under Sec.143,145,341 of IPC & Sec. 135 of Maharashtra Police Act, 1951 Cr No. 09/2013 at Mandrup Police Station, South Solapur, Dist. Solapur |
| 12 | High Court of Bombay | Cri.W.P. 377619/2019 | The case is pending before the Hon'ble High Court at the status of Pre-Admission Stage | Criminal Write Petition No. 3776/2019 (Subhash Deshmukh V/s State of Mah. & Others) |
| | | | | |

(B) Details about cases of conviction for criminal offences

| Sl. No. | Name of Court And date(s) of Order(s) | Description of office(s) and Punishment imposed | Maximum Punishment Imposed |
|---|---|---|---|
| | Not Applicable | Not Applicable | Not Applicabe |

# माधवराव लामखडे यांची पुन्हा घरवापसी

## शरद पवारांची बारामतीत भेट; महायुतीच्या ऐक्याला आठ दिवसातच तडा



**बारामती (कटूसत्य वृत्त):-** शरद पवार यांनी उमेदवारी नाकारल्यामुळे महाविकास आघाडीतून महाआघाडीमध्ये सहभागी झालेले नगर तालुक्यातील जिल्हा परिषदेचे मा. सदस्य माधवराव लामखडे यांनी आठच दिवसांत काडीमोड करत पुन्हा घरवापसी केली. बारामतीमध्ये घडलेल्या नाटयमय घडामोडीत लामखडे यांनी पुन्हा शरद पवार गटात प्रवेश करत राणी लंके यांच्या प्रचारात सहभागी होण्याची घोषणा बारामतीमध्ये केली.

विधानसभेची सार्वत्रीक निवडणूक जाहिर झाल्यानंतर महाविकास आघाडीची उमेदवारी कोणाला या विषयावर महिनाभर खल झाला. अखेर जागा राष्ट्रवादीकडे असल्याने खा. नीलेश लंके यांच्या पत्नी राणीताई लंके यांना उमेदवारी जाहिर झाली. या उमेदवारीसाठी नगर तालुक्यातील मातब्बर नेते, जिल्हा परिषदेचे मा. सदस्य माधवराव लामखडे हे इच्छुक होते. लामखडे यांनी शरद पवार यांची भेट घेउन उमेदवारी हवी अशी मागणीही केली होती, मात्र पवार यांच्यासह महाविकास आघाडीने केलेल्या सर्वेक्षणानुसार राणी नीलेश लंके यांना उमेदवारी देण्याचा निर्णय जाहिर करण्यात आला होता.

शरद पवार यांचा निर्णय न रूचल्याने माधवराव लामखडे यांनी राष्ट्रवादी अजित पवार गटामध्ये प्रवेश करत उमेदवारीची मागणी केली होती. तिथेही त्यांना उमेदवारीचा शब्द देण्यात आला होता. मात्र अजित पवार यांनीही त्यांना उमेदवारी नाकारली. लामखडे यांनी मंगळवारी स्वतःचा अपक्ष उमेदवारी अर्जही दाखल केला. मात्र जनतेचा कानोसा घेतल्यानंतर शरद पवार हेच महाराष्ट्राचे हित जोपासणार ही भावना लक्षात आल्यानंतर खा. नीलेश लंके यांच्या माध्यमातून आपण बारामती येथे खा. शरद पवार यांची भेट घेत पुन्हा शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला व राणी लंके यांच्या प्रचारात सक्रीय होण्याचा निर्णय जाहिर केल्याचे लामखडे म्हणाले.

**लामखडे यांची भूमिका चुकीच्या पध्दतीने मांडली**

नगर तालुक्याचे नेते माधवराव लामखडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेपासून शरद पवार यांच्या विचारधारेवर काम करून पक्षाचे ध्येय धोरणे घराघरात पोहचविलेली आहेत. आजच्या शरद पवार साहेबांच्या भेटीत अनेक राजकीय चर्चा झाल्या. यावेळी लामखडे यांनी पारनेर-नगर मतदारसंघातील आघाडीच्या उमेदवाराला जास्तीत जास्त मताधिक्क्याने विजयी करण्याची जबाबदारी स्विकारली आहे. मधल्या काही कालावधीत माधवराव लामखडे यांच्याविषयी समाजात समज,गैरसमज पसरविण्यात आले होते, चुकीच्या पध्दतीने त्यांची भूमिका मांडण्यात आली.

**- खा. नीलेश लंके**

**फक्त बैठकीसाठी गेलो !**

आमचे नेते शरद पवार यांची आज बारामती येथे खा. नीलेश लंके यांच्यासमवेत गोविंद बागेत भेट झाली.राष्ट्रवादीच्या स्थापनेपासून मी त्यांच्याबरोबर काम करतो आहे, व होतोही, दोन तिन आठवडयांपूर्वी माज्यासह काही नेते मंडळींनी अजितदादांकडे जाऊन त्यांच्या पक्षात प्रवेश केला. माज्याकडून अनावधानाने ती गोष्ट घडली. मुंबईस जाताना अजित पवार यांच्याशी बैठक आहे असे सांगण्यात आले होते, पक्षात प्रवेश आहे असे काहीही सांगण्यात आले नव्हते.

**- माधवराव लामखडे,** मा.सदस्य जि प नगर

**नगर तालुक्याची लेक आमदार होणार !**

पक्षाच्या उमेदवार राणी लंके या नगर तालुक्यातील अरणगांव येथील कन्या आहेत. नगर - पारनेर असा भेदभाव राहण्याचे काहीच कारण नाही. तसा कोणीही बुध्दीभेद करण्याचे कारण नाही कारण नगर तालुक्याची लेक आपल्या मतदारसंघाची आमदार होणार आहे.

**- माधवराव लामखडे,** मा. जि प सदस्या



# Classified - छोटी जाहीरात

**यात्रा**

उज्जैन, सिहोर, प्रदीप महाराज सह शेगाव, ५ ज्योतिर्लिंग, १८ सप्टेंबर
अष्टविनायक, भीमाशंकर, जेजुरी १९ सप्टेंबर,
श्रीशैल्य, तिरुपती, रामेश्वर, कन्याकुमारी १० नोव्हेंबर,
काशी, अयोध्या २७ नोव्हेंबर
**मल्लिकार्जुन ट्रॅव्हल्स**
**९४२२४६०३१९**

**विकणे आहे**

सोलापूर शहरातील चांगल्या लोकवस्तीतील ST स्टॅन्ड व रेल्वे स्टेशन जवळ आवंतीनगर, शरद पवार शाळेजवळ, लोकमंगल ऑक्सिपार्क, येथील अ विंग मधील ७०४ नंबरचा फ्लॅट विकणे आहे.
**संपर्क:**
**9881361260**

**पाहिजेत**

**फॅब्रिकेशन कामासाठी अनुभवी हुशार कामगार पाहिजे.**
**संपर्क:**
**गणेश स्टील फॅब्रिकेशन**
**९९२२५२५२३७**

**पाहिजेत**

सोलापूरात कामासाठी पाहिजेत.
कॉम्प्युटर ऑपरेटर, अकाउंटंट, टेलीकॉलर, माकेर्टींग एक्झिक्युटिव्ह, सेल्समन, वर्क फ्रॉम होम डाटा एन्ट्री (लिखाण व टायपिंग काम) उपलबध आहे.
संपर्क: **9591409911 / 9272021110**

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या**
स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

**-: संपर्क :-**
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**बांधकाम**

घर बांधा, सोलापूर महानगर पालिका नियमाप्रमाणे. बांधकाम परवानगी मिळेल. संपर्क:
**चेतन अलकुंटे**
**९५६१४३३३७७**

**लोन**

**संपूर्ण महाराष्ट्रात सर्व प्रकारचे लोन मिळतील**
**संपर्क: 8689934996**




**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**
**दारू... अंमली पदार्थ...**
**गॅरंटेड सुटण्यासाठी...**
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..
**(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)**
**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
**फोन: 9552619752**
कॉल/व्हॉटसॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# मुद्रित व इलेक्ट्रॉनिक माध्यमातील पेड न्यूजवर करडी नजर ठेवावी - निवडणूक खर्च निरीक्षक मीना तेजराम

## जिल्हास्तरीय माध्यम प्रामाणिकरण व संनियंत्रण समितीला निवडणूक खर्च निरीक्षक यांची भेट व कामकाजाची पाहणी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असून त्या अनुषंगाने जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण आणि सनियंत्रण समिती (एमसीएमसी) कार्यान्वित करण्यात आली आहे. या समितीने निर्भय व निष्पक्ष पदधतीने मुद्रित व इलेक्ट्रॉनिक माध्यमातून प्रसारित होणाऱ्या पेड न्यूजसह सोशल मिडीयाच्या वापरावरही करडी नजर ठेवण्याचे निर्देश सोलापूर शहर उत्तर सोलापूर शहर मध्य अक्कलकोट व दक्षिण सोलापूर या विधानसभा मतदार संघाचे निवडणूक खर्च निरीक्षक मीना तेजराम श्रीमनलाल यांनी दिले.

यावेळी जिल्हा माहिती अधिकारी तथा समितीचे सदस्य सचिव सुनील सोनटक्के, समिती सदस्य तथा क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंकुश चव्हाण, सदस्य डॉ श्रीराम राऊत, अंबादास यादव, रफिक शेख, गणेश बिराजदार, सचिन सोनवणे आणि समीर मुलानी आदी उपस्थित होते.

निवडणूक काळात माध्यम प्रमाणीकरण व माध्यम सनियंत्रण समितीची भूमिका अत्यंत महत्वाची असून समाज माध्यमाद्वारे होणाऱ्या प्रचारावरही या समितीने काळजीपूर्वक लक्ष ठेवावे. वृत्तपत्रात येणाऱ्या संशयीत पेड न्यूज शोधून संबंधित उमेदवाराच्या निवडणूक खर्चात तो खर्च समाविष्ठ करावा. भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशांप्रमाणे अत्यंत काटेकोरपणे समितीने कामकाज करावे. समितीने दैनंदिन पेड न्यूजचा अहवाल खर्च समितीला सादर करावा असेही मीना यांनी सांगितले. विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने सोलापूर शहर उत्तर, सोलापूर शहर मध्य, अक्कलकोट व दक्षिण सोलापूर या विधानसभा मतदारसंघासाठी नियुक्त निवडणूक खर्च निरीक्षक श्री मीना यांनी आज जिल्हा माध्यम कक्ष व एमसीएमसी समिती कक्षाला भेट दिली.

इलेक्ट्रॉनिक माध्यमातील जाहिरातीवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्थापित करण्यात आलेल्या टीव्ही युनिट च्या कामकाजाची माहिती,नोंदी व रिपोर्ट कशा पद्धतीने दिला जातो याविषयी युनिट चे प्रमुख रफिक शेख आणि सचिन सोनवणे यांनी सविस्तर माहिती दिली. डॉ श्रीराम राउत यांनी सोशल मिडिया वर राजकीय पक्ष व उमेदवाराचा छुपा खर्च कशा पद्धतीने काढला जातो याची सविस्तर माहिती दिली. अंबादास यादव व गणेश बिराजदार यांनी पेड न्यूज कात्रणे आणि दैनंदिन निवडणूक कायार्लायाला देण्यात येणाऱ्या अहवालाविषयी सविस्तर माहिती दिली. जिल्हा माध्यम कक्षातून जिल्हा निवडणूक प्रशासनाच्या वतीने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक संबंधी प्रसार माध्यम वृत्तपत्र प्रतिनिधी यांच्याशी समन्वय राखला जात आहे. यासाठी माध्यम प्रामाणिकरण व संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली असून उमेदवारांच्या प्रचार जाहिराती, राजकीय जाहिराती यांचे प्रमाणीकरण करण्याचे कार्यवाही केली जाते. पेड न्यूज व जाहिरात पूर्व प्रामाणिकरणाच्या अनुषंगाने नियुक्त केलेल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात आलेले असून प्रिंट, इलेक्ट्रॉनिक पोस्ट, सोशल मीडियातील प्रतिनिधीची या अनुषंगाने कार्यशाळा घेण्यात आलेली आहे. त्याप्रमाणेच राजकीय पक्षांना पेड न्यूज व जाहिरात पूर्वप्रमानीकरण याची माहिती देण्यात आल्याची माहिती समिती सदस्य सचिव श्री. सोनटक्के यांनी तसेच सहाय्यक नोडल अधिकारी श्री. चव्हाण यांनी दिली.

# मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी जिल्ह्यात जनजागृती




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले असून 20 नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी जिल्हा प्रशासन, निवडणूक विभागाच्या वतीने विशेष लक्ष देऊन प्रयत्न केले जात आहे.

लोकसभेच्या निवडणुकीत ज्या मतदारसंघात 50 टक्केपेक्षा कमी मतदान झाले आहेत. अशा ठरावीक बुथ, केंद्र परिसरात बीएलओ, अंगणवाडी सेविका, पोलिस पाटील, शिक्षक यांच्यामार्फत गृहभेटी देऊन मतदान जनजागृती करण्यात येत आहे. लोकसभेपेक्षा विधानसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी, ज्या ठिकाणी मतदान कमी झाले, अशा ठिकाणी मतदान जनजागृती करण्यास जिल्हा प्रशासन, निवडणूक कार्यालयाच्या वतीने करण्यास सुरूवात झाली आहे. अपर जिल्हाधिकारी मोनिकासिंह ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली जनजागृती सुरू आहे.महाविद्यालयात जे ब्रँड ॲम्बेसिडर आहेत त्यांच्यामार्फत नुकतेच 18 वर्ष पूर्ण झालेले व पहिल्यांदा मतदान करणार आहेत व इतर विद्यार्थी महाविद्यालयात मतदान करा, असे प्रबोधन सुरू आहे. वर्कशॉप घेऊन त्यांना मार्गदर्शन ही करण्यात आले आहे. आपले नाव मतदान यादीत नसल्यावर वोटर हेल्पलाईनवर जावून कशाप्रकारे नाव शोधावे, यासाठी मार्गदर्शन देण्यात आले आहे.

तसेच शहर जिल्ह्यातील शाळेमध्ये मुलांकडून मतदान करा, असे पत्र लिहून घेण्यात आले. आई-वडील, घरातील सर्वांना मतदान करण्यास सांगावे, असे आवाहन ही करण्यात आले. घोषवाक्य स्पर्धा घेवून ही जनजागृती सुरू आहे. दिवाळीनिमित्त बाजारपेठेत नागरिक मोठ्या संख्येने नवी पेठसह इतर ठिकाणी गर्दी करतात. त्यामुळे दुकानाबाहेर मतदान करण्याचे पत्रक लावण्यात आले. चेंबर ऑफ कॉमर्स संघटनेच्या वतीने शहरातील प्रमुख तीन मतदारसंघातील कामगार, विडी महिला कामगारांत मतदानासंबंधी तसेच रिक्षावर पोस्टर लावून जनजागृती सुरू आहे.

एकंदरीत, लोकसभेप्रमाणेच यंदाही जिल्हा प्रशासनाच्या वतीने मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी मोठी मेहनत ऊन नागरिकांत प्रचार करीत आहेत. याचा फायदा होणार का, मतदानाचा टक्का वाढणार का, हे मतदानानंतरच स्पष्ट होईल.

# अनिल सावंत यांच्यासाठी शरद पवार मतदारसंघात घेणार दोन सभा

## कामाला लागण्याचे पवार साहेबांचे आदेश

**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात कसल्याही परिस्थितीत माघार न घेता अनिल सावंत हे आपले अधिकृत उमेदवार आहे आणि त्यांच्या विजयासाठी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी जीवाचे रान करावे.

पंढरपूर आणि मंगळवेढा या दोन्ही तालुक्यात मी दोन सभा घेणार आहे. सभेच्या तारखा लवकरच तुम्हाला सांगितले जाणार असल्याचेही यावेळी भेटीदरम्यान खासदार शरद पवार यांनी पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील भेटीसाठी आलेल्या राष्ट्रवादीच्या शिष्टमंडळाला केले असल्याची माहिती शरद पवार पक्ष राष्ट्रवादीचे मंगळवेढा शहराध्यक्ष चंद्रशेखर कोंडूभैरी यांनी दिली आहे.

आज पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील दोन्ही तालुक्याचे राष्ट्रवादीचे शिष्टमंडळ खासदार शरद पवार यांच्या



भेटीला गेले होते. यामध्ये दोन्ही तालुक्यातील राष्ट्रवादीच्या मुख्य पदाधिकाऱ्यांचा समावेश होता.

पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीमध्ये बिघाडी झाली आहे. तूतारीचा एबी फॉर्म अनिल सावंत यांना मिळाला आहे. यासंदर्भात दोन्ही तालुक्यातील राष्ट्रवादीचे शिष्ट मंडळ खासदार शरद पवार यांच्या भेटीसाठी गेले होते.

यावेळी राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी मतदारसंघातील संपूर्ण ग्राउंड रिपोर्ट सांगितला असल्याची माहिती मिळत आहे. आणि यानुसार दोन्ही शहर व ग्रामीण भागात सध्या तुतारीची हवा असल्याची माहिती दिली आहे.

यानंतर शिष्टमंडळाने आपला मोर्चा अकलूज कडे वळविला माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांचे सोबत देखील चर्चा केली. यावेळी मोहिते पाटील यांनी अनिल सावंत यांच्या विजयासाठी कामाला लागण्याची आदेश दिले आहेत.याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रांतिक सदस्य राहुल शहा, कार्याध्यक्ष संतोष रंदवे, विशाल खटकाळे, पंढरपूर तालुका अध्यक्ष संदीप मांडवे, शहराध्यक्ष सुभाष भोसले, दत्ता पाटील, माणिक गुंगे, आंधळगावचे सरपंच लहुजी लेंडवे, बंडू पाटील, नवनाथ यादव, आप्पासाहेब माने सरकार, सलगर चे बंडु जाधव, अमर सोमगुंडे, सागर गुरव, पंडित गवळी, बबन ढावरे, सुभाष सुडके, नाना करपे, काशिनाथ पाटील,गुरय्या स्वामी, सिताराम भगरे, काशिनाथ सावजी, दादा भगरे, इसाक शेख, फिरोज मुलाणी, मुझफ्फर काझी, बापू वस्त्रे, संतोष नागणे आदी उपस्थित होते

# गुरसाळे येथील यमाई बचत गटाच्या सदस्यांना दिवाळी भेट

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** दिवाळी सणानिमित्त गुरसाळे येथील यमाई महिला बचत गटातर्फे शिवप्रसाद महिला पतसंस्थेच्या अध्यक्षा ऋतुजा मोरे, गुरसाळेचे सरपंच सागर खिलारे, विकास सोसायटीचे अध्यक्ष गुलाबराव गायकवाड, दत्तात्रय सूर्यवंशी, साधू सावंत, सागर सूर्यवंशी व दूध उत्पादक सभासद या प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत सभासदांना किराणा साहित्य वाटप करण्यात आले. गुरसाळे तालुका माळशिरस येथे २००७ साली बेबी दत्तात्रय सूर्यवंशी यांनी महिलांना सोबत घेऊन यमाई

महिला बचत गटाची स्थापना केली.या माध्यमातून सामाजिक



कार्य करीत असताना हा महिला बचत गट केंद्र सरकारच्या योजनेअंतर्गत नोंदला गेला.त्यानंतर गुरसाळे येथील बँक ऑफ इंडिया शाखेमधून दहा लाख रुपयांचे कर्ज विनातारण अल्पदराने मिळाले.

त्यातून या महिलांनी संकरित गायी खरेदी केल्या आणि आपल्या कुटुंबाला हातभार कुटुबाला लावला आहे. हे दूध दहिगाव येथील शिवप्रसाद दूध संघास दिले जात आहे.

या बचत गटाने चार लाख घेतलेले कर्ज अवघ्या आठ महिन्यांतच सर्व कर्जाची परतफेड केली असल्याचे मत यमाई बचत गटाच्या अध्यक्षा बेबीताई सूर्यवंशी यांनी व्यक्त केले. कार्यक्रमासाठी बचत गटाच्या पदाधिकारी व सदस्या उपस्थित होते.

# तुफानी पावसामुळे कित्येक झाडे उध्वस्त तर अनेक दुकाने भुईसपाट

## 'परतीच्या पावसाचा अकलूज मध्ये धुमाकूळ'

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज येथे काल सायंकाळी परतीचा पाऊसाने, धुमाकूळ घातला असून,वादळी वा-यासह विजांच्या कडकडाटानेही मुसळधार पाऊसाला साथ दिली. या वादळी वाऱ्यामुळे, सदुभाऊ चौक,



शिवशंकर बझार जवळील आणि डॉ.आंबेडकर चौक येथील एका किराणा दुकानावर झाड उन्मळून पडल्याने मोठे नुकसान झाले. मात्र दैव बलवत्तर कोणतीही जीवित हानी झाली नाही.

दिपावलीनिमित्त बाजारपेठेत विविध वस्तूंची आणि पूजनाच्या साहित्यांची दुकाने थाटली होती पण अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह, पावसामुळे एकच गोंधळ उडाला.अनेकांच्या मालाचे पावसामुळे नुकसान झाले.त्यामुळे छोट्या व्यवसायीकांना दुष्काळात तेरावा महिना म्हणण्याची वेळ आली आहे.

काल रात्री अचानक वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडायला सुरुवात झाल्यानंतर मोठी झाडे रस्त्यावर पडली तर काही ठिकाणी खांबावरील तारा तुटल्या पडल्या होत्या.पण पाऊस थांबताच अकलूज नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांचे रस्त्यावर पडलेली झाडे लगेच बाजूला केली तर महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी काही क्षणातच विद्युत पुरवठा सुरळीत केला.त्यामुळे अकलूजच्या नागरिकांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना धन्यवाद दिले.

# विकासाच्या मुद्द्यावर निवडणूक रिंगणात आ. संजय शिंदे यांची भूमिका

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** लोकप्रतिनिधी म्हणून काम करताना मी माझा व विरोधातला असा कधीही भेदभाव केला नाही. आलेल्या प्रत्येकाचे काम करण्यावर भर दिला आहे. यापुढेही विकासकामे करण्याचा प्रयत्न करणार असून याच मुद्द्यावर निवडणुकीला सामोरे जाणार आहे, असे आमदार संजयमामा शिंदे यांनी म्हटले आहे.आ. शिंदे यांनी विधानसभेसाठी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला आहे. त्यानंतर त्यांनी प्रचाराचा शुभारंभ केला आहे. या पार्श्वभूमीवर पोथरे येथे नागरिकांशी संवाद साधताना ते बोलत होते.



आमदार शिंदे यांनी, या पंचवार्षिकमध्ये कुकडी प्रकल्पाचे पाणी बंद पाइपद्वारे मांगी तलावात सोडण्यात यावे म्हणून आमदार शिंदे यांनी पाठपुरावा केला. त्याच्या सव्हेर्चे आदेश प्राप्त झाले होते. कुकडी प्रकल्पावर अवलंबून असलेला मांगी तलाव पूर्ण क्षमतेने भरला पाहिजे आणि लाभक्षेत्रातील गावांना त्याचा फायदा झाला पाहिजे. यादृष्टीने प्रस्तावित कुकडी उजनी उपसा सिंचन योजनेचे पाणी मांगी तलावत सोडणे आणि त्या माध्यमातून या भागाचा कायापालट करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले.

# डोणजमध्ये उद्या अंबीर मुलाणी स्मृती करंडक किशोर गट खो-खो स्पर्धा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** डोणज (ता. मंगळवेढा) येथील जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर अंबीर मुलाणी स्मृती करंडक 14 वर्षाखालील गटाची जिल्हा किशोर खो-खो स्पर्धा रविवारी 3 नोव्हेंबर रोजी आयोजित केली आहे. सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशच्या मान्यतेने डोणज येथील ए. एम. स्पोर्टस् क्लबच्या वतीने वतीने ही स्पर्धा आयोजित केली आहे. या स्पधेर्तील प्रथम चार संघास 10, 7, 5 व 3 हजार रुपयांचे पारितोषिक ठेवण्यात आले आहे.

तसेच सर्वोत्कृष्ठ अष्टपैलू, आक्रमक व संरक्षक यासाठी प्रत्येकी 1 हजार रुपयांचे पारितोषिक आहे.

3 नोव्हेंबर 2024 रोजी भाग घेणारा खेळाडू 14 वर्षाखालील असावा. स्पर्धेच्या वेळी भाग घेणाऱ्या संघानी जन्मतारखेचा दाखला व आधार कार्ड दाखल करणे बंधनकारक आहे. इच्छुक संघानी आमसिद्ध कोळी (7796873349), सागर बगले (7083345355) रोहित लिगाडे (9503705855) अथवा अजित कोळी (8767232574) यांच्याशी संपर्क साधावा.

# 'आमदार निवडून आणूनच,सन्मानाने पक्षात प्रवेश करणार' उमेश पाटलांनी अजित पवारांविरोधात दंड थोपटले

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):** विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली आहे. निवडणुकीच्या आधीच अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते उमेश पाटील यांनी पक्षाला राजीनामा दिला आहे.

उमेश पाटील यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाला पाठिंबा दिला आहे. पण त्यांनी पक्षात अजूनही प्रवेश केलेला नाही. शुक्रवारी पाटील यांनी बारामतीमध्ये खा.शरद पवार यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी पत्रकारांसोबत संवाद साधला. 'मोहोळ विधानसभेतील उमेदवार निवडून आणणार आणि सन्मानाने पक्षात प्रवेश करणार', अशी प्रतिक्रिया दिली. आता बारामतीत पवार कुटुंबात दोन ठिकाणी पाडवा साजरा केला जात आहे. दोन ठिकाणी पाडवे होत असल्यामुळे दोन्ही गटातील कार्यकर्त्यांना हे वेदनादायी असल्याचे पाटील म्हणाले. उमेश पाटील यांनी आज खा.शरद पवार यांची भेट घेतली. यावेळी त्यांच्या भेटीत मोहोळ विधानसभा मतदारसंघाबाबत चर्चा झाली. उमेदवार विजयी होण्यासाठी प्रयत्न करणार आहे, असंही उमेश पाटील म्हणाले.



### ...यामुळे मोहोळची उमेदवारी बदलली

"मतदारसंघात राजन पाटील यांचे वर्चस्व आहे, ५० वषार्चे त्यांचे साम्राज्य आहे. तिथे त्यांच्याविरोधातील घटक जास्त आहेत. या सगळ्यांचे उमेदवारीबाबत काही प्रश्न होते. त्यांना निवडून आणण्यात आम्हाला अडचणी येत होत्या. यशवंत माने यांच्याविरोधात भूमिपुत्र उमेदवार हवे होते, यशवंत माने भूमिपुत्र नाहीत, ते सोलापूर जिल्ह्यातील नाहीत. आता भूमिपुत्र असलेल्या राजू खरे यांना उमेदवारी दिल्यानंतर फरक पडणार आहे. कारण मोहोळ मतदारसंघात भूमिपुत्राची मागणी होत होती, रमेश कदम हे भूमिपुत्र नाहीत त्यामुळे ती अडचणीची ठरत होती. त्यामुळे ती बदलली, अशी माहिती उमेश पाटील यांनी दिली.

यावेळी बोलताना उमेश पाटील म्हणाले, बारामतीमध्ये उद्या फार गर्दी असते त्यामुळे आजच दिवाळीच्या शुभेच्छा देण्यासाठी आलो होतो.त्याचबरोबर माझ्या मतदारसंघातील काही चर्चा करायच्या होत्या, त्यासाठी आलो होतो. मोहोळ विधानसभा मतदारसंघात आम्ही राजू खरे उमेदवार दिले आहेत. या मतदारसंघासाठी आम्ही मार्गदर्शन घेण्यासाठी आलो होतो, असंही पाटील म्हणाले.

**सन्मानाने पक्षात प्रवेश करणार**

"मी शरद पवार यांना आमदार निवडून आणणार आणि मगच पक्षात सन्मानाने प्रवेश करणार असल्याचा शब्द दिला आहे. माझ्या मतदारसंघातील लोकांना माझी काळजी असणार आहे. त्यामुळे त्या जनतेसाठी मी अजित पवार यांच्यासोबत असलेले राजकीय संबंध बाजूला केले. मी मुळचा शरद पवार यांचा कार्यकर्त्या आहे. आपण शरद पवार यांच्याकडे काहीतरी मागत असताना त्यासाठी आपण आधी काहीतरी द्यायला पाहिजे, त्यासाठी आधी आमदार निवडून आणायचा मगच प्रवेश करायचा, असंही उमेश पाटील म्हणाले.

**'पवार कुटुंबात फूट पडायला नको होती'**

बारामतीमधील दोन पाडवा कार्यक्रमावर बोलताना उमेश पाटील म्हणाले, सर्व कार्यकर्त्यांना, आमदारांना, खासदारांना हे कुटुंब एकत्र असायला पाहिजे असं वाटतं. मी अजित पवार यांच्या पक्षात मुख्य प्रवक्ता होतो, तिथल्याही आमदारांची भावना हे कुटुंब एकत्र असायला पाहिजे होतं अशी भावना आहे, ही फूट व्हायला नको होती,असंही पाटील म्हणाले.

# देशामधील पहिल्या ब्रीज कम बॅरेजची दक्षिण सोलापूर मतदारसंघात उभारणी- सुभाष देशमुख



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सीना नदीतील केटीवेअरमधून पाण्याची गळती होऊन नदीत पाणीसाठा राहत नाही हे लक्षात घेऊन देशातील पहिला ब्रीज कम बॅरेज बांधून नदीत बारमाही पाण्याचा प्रयत्न केला. उत्तर सोलापूर तालुक्यात तिन्हे व दक्षिण सोलापूरमध्ये विजयपूर महामार्गावर वडकबाळ येथे बॅरेज बांधण्याचे काम सुरू केले. त्यामुळे मतदारसंघात जलक्रांती होणार असल्याचे प्रतिपादन दक्षिण सोलापूर विधानसभा महायुतीचे उमेदवार आ. सुभाष देशमुख यांनी केले. दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील आमदार सुभाष देशमुख यांनी संवाद साधला. यावेळी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, तिन्हे येथे सीना नदीवर लांबी ९० मीटर तर उंची ४.५० मीटरमध्ये १० गाळे आहेत. त्यामुळे नदीत ७६.७६ दशलक्ष घनमीटर पाणी साठणार असून महामार्गावर होणारा हा देशातील पहिला ब्रीज कम बॅरेज. शिंगोली, तरटगाव, तिन्हे आदी गावांसह ३५७ हेक्टर सिंचनाखाली येणार आहे. वडकबाळ येथे ७० मी. लांब व ३.५० मी. उंचीचा बंधारा बांधण्याचे काम सुरू आहे. १० गाळे असून १ बाय लोखंडी दरवाजे या बंधाऱ्यांना असतील. त्यामुळे वडकबाळ, वांगी, हत्तूर, समशापूर गावातील २९९ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येत आहे.

पाझर तलावांच्या दुरुस्तीसाठी ३.८० कोटी रुपयांचा निधीत दुरूस्ती करत पाण्याच्या होणारी नासाडी थांबवली. याशिवाय १५.४० कोटी रुपयांचा निधी देऊन पाणी आडवण्यासाठी अनेक ठिकाणी सिमेंट बंधारे बांधले व तलावांचे खोलीकरण करत जलसाठा वाढवला. त्यामुळे सूक्ष्म सिंचनातून जमीन ओलिताखाली येऊ लागली आहे.

# सावंत गटाचा रविवारी मेळावा वाकाव येथे आयोजन

## माढा विधानसभेसाठीची निर्णायक भूमिका ठरणार - प्रा.शिवाजीराव सावंताच्या भुमिकेककडे लक्ष

**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढा विधानसभा मतदार संघातील राजकीय घडामोडींवर विचार विनिमय करून व कार्यकर्त्यांची मते जाणून घेऊन राजकीय निर्णय घेण्यासाठी रविवारी ३ ऑक्टोबर रोजी वाकाव ता.माढा येथे शिवसेनेचे जिल्हा संपर्क प्रमुख प्रा.शिवाजीराव सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत

मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.याबाबतची माहिती माजी ता.प.सदस्य पृथ्वीराज सावंत यांनी दिली.

रविवारी सकाळी साडेअकरा वाजता, जयवंत बंगल्या समोरील प्रांगणात मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.महायुतीतील घटकपक्ष असलेल्या शिवसेना शिंदे गटाचे संपर्क प्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत यांनी यापूर्वी माढ्यात मेळावा घेत माढा विधानसभेसाठी इच्छुक असल्याची भुमीका मांडली होती.

माढा विधानसभेची जागा महायुतीमधुन अजित पवाराच्या राष्ट्रवादीला गेली.अजित पवार गटातुन निवडणुक लढविण्यासाठी प्रा.शिवाजीराव सावंत यांचे

पुत्र पृथ्वीराज सावंत यांचेसह शरद पवार गटाचे नेते शिवाजी कांबळे यांनी इच्छुक असल्याचे सांगत तिकीटाची मागणी केली होती.मात्र नाट्यमय घडामोडीनंतर

मविआ मधील काँग्रेस पक्षाच्या माढ्याच्या नगराध्यक्षा मिनल साठे यांनी कॉग्रेस पक्षातुन



राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश करुन थेट तिकीट मिळवत महायुतीकडून उमेदवारी अर्ज दाखल केला.ॲड.साठेनी अर्ज दाखल करताना महायुतीतील इतर घटक पक्षाचे खास करुन भाजपसह -शिवसेना सावंत परिवारातील कोणीही उपस्थित नव्हते.पृथ्वीराज सावंत हे जि.प.चे. माजी सभापती शिवाजी कांबळे यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करताना मात्र आवर्जून उपस्थित राहिल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या गेल्यात.या मेळाव्यात प्रा. शिवाजीराव सावंत महायुतीचा धर्म पाळण्याची घोषणा करतील की अन्य वेगळी राजकीय भुमिका मांडतील हे पहावं लागणार असुन माढा मतदार संघात प्रा.शिवाजीराव सावंत यांना मानणारा स्वतंत्र गट असुन सावंताची भुमिका माढ्यात निर्णायक ठरणार आहे.त्यामुळे सावंताच्या मेळाव्याकडे अनेकांचे लक्ष लागले आहे.

# सुभाष देशमुखांसाठी जुळली पॉझिटिव्ह समीकरणे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रामध्ये भारतीय जनता पार्टीला निगेटिव्ह वातावरण दिसून आले. तेच वातावरण विधानसभा निवडणुकीतही राहील अशा चर्चा ऐकण्यास मिळाल्या. एकीकडे असे असताना दुसरीकडे दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार सुभाष देशमुख यांच्यासाठी पॉझिटिव्ह समीकरणे जुळून आल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे देशमुख हे महाविकास आघाडीतील बिघाडी पाहता लकी मानले जात आहेत. दक्षिण विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसच्या प्रणिती शिंदे यांना दहा हजाराचे मताधिक्य मिळाले. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा उमेदवार निश्चित



विजयी होईल असे बोलले गेले. पण या मतदारसंघातून इच्छुक असलेले माजी आमदार दिलीप माने, दूध संघाचे संचालक सुरेश हसापुरे, माजी स्थायी समिती सभापती बाबा मिस्त्री, महादेव कोगनुरे हे प्रमुख नेते इच्छुक होते. त्यानंतर दक्षिणचे राजकारणात धर्मराज काडादी यांची एन्ट्री झाली. त्यामुळे सगळी समीकरणे बिघडली. या सर्व गोंधळात महाविकास आघाडी मधून उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमर पाटील यांना उमेदवारी देण्यात आली.

# दीपावलीनिमित्त इच्छा भगवंताची परिवाराच्या वतीनं तटकरे परिवारांचा विशेष सत्कार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** इच्छा भगवंताची परिवाराच्या वतीनं दीपावलीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पाटीर्चे प्रदेश अध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे, महिला बालकल्याण मंत्री आदिती तटकरे आणि माजी आमदार अनिकेत तटकरे यांचा रायगड येथील गीता बाग सुरत वाडी तालुका रोहा येथे विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पाटीर्चे प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हा नियोजन समितीचे विशेष निमंत्रित सदस्य किसन जाधव यांनी अजित पवार गटाचे राष्ट्रवादी काँग्रेस पाटीर्चे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांना महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी यांचं अस्सल सोलापुरी चादरीमध्ये विणलेले प्रतिमा देऊन त्यांचा विशेष सत्कार करून शुभेच्छा दिल्या तसेच महिला बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांना शिडीर्चे साईबाबा



यांची स्केच प्रतिमा देऊन तसेच माजी आमदार अनिकेत तटकरे यांना सोलापूर चादरी मध्ये विणलेल्या श्री तिरुपती बालाजी फोटो,शाल,पुष्पगुच्छ व सोलापुरी चादर ,टॉवेल,नॅपकिन भेट देण्यात आले. याप्रसंगी प्रदेश युवक सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शहर उपाध्यक्ष उमेश जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शहर सरचिटणीस अभिजीत कदम, महादेव राठोड, पवन बेरे, आदींचे प्रमुख उपस्थिती होती. येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतींच्या उमेदवारांना भरघोस मतांनी निवडून देण्यासाठी राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे येणाऱ्या काही दिवसांमध्ये राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्यात महायुतीचे सरकार येईल आणि राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा तथा उपमुख्यमंत्री अजित पवार हे राज्याचे मुख्यमंत्री होतील अशी मनोकामना यावेळी राष्ट्रवादी प्रदेश अध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त केलं. दरम्यान सोलापूरी चादर हे जगभर ब्रांडींग व्हावं या उद्देशाने सोलापूरची शेंगा चटणी, कडक भाकरी अशा खाद्य संस्कृतीचा प्रचार व प्रसार करण्यासाठी आम्ही नेहमी अग्रेसर असतो आज विशेषतः दीपावलीनिमित्त तटकरे परिवाराचे इच्छा भगवंताची परिवाराच्या वतीनं विशेष सत्कार करण्यात आला यामध्ये केवळ आणि केवळ सोलापूरचे नाव लौकिक होणे ह्याला आम्ही प्राधान्य दिला असे मत यावेळी राष्ट्रवादी प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हा नियोजन समिती सदस्य किसन जाधव यांनी सांगितले.